सरळसेवा सहायक कक्ष अधिकारी (मुख्य) परीक्षा-२०२४
महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांचे मंत्रालयीन प्रशासकीय विभाग व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील सहायक कक्ष अधिकारी पदावर नियतवाटप.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
क्रमांक : सकनि ११२६/प्र.क्र. ४०/प्रशा-३ (१४-अ),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दूरध्वनी क्रमांक : ०२२-२२७९४१७२.
दिनांक : १२ मार्च, २०२६.

ज्ञापन :-

महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त मुख्य परीक्षा-२०२४ या परीक्षेतील सहायक कक्ष अधिकारी संवर्गाच्या ५५ पदांसाठी (मंत्रालय ५४ + महाराष्ट्र लोकसेवा आयोग ४ = ५५) दिनांक २९.०६.२०२५ रोजी घेण्यात आलेल्या मुख्य परीक्षेचा अंतिम निकाल दि. ०९.०१.२०२६ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केला आहे. सरळसेवा सहायक कक्ष अधिकारी (मुख्य) परीक्षा-२०२४ च्या अंतिम निकालाच्या आधारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने क्रमांक: १४४२(२)(१)/ २०२४/ तेवीस, दिनांक २८.०१.२०२६ च्या पत्रान्वये शिफारस केलेल्या सोबतच्या **विवरणपत्र "अ"** मधील उमेदवारांचे त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या मंत्रालयीन विभागात/महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयात सहायक कक्ष अधिकारी पदावर नियतवाटप करण्यात येत आहे.

२. सोबतच्या विवरणपत्र "अ" मध्ये नमूद केलेल्या उमेदवारांची नेमणूक पुढील अटी व शर्तीच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात करण्यात यावी :-

(१) सदर विवरणपत्रातील सर्व उमेदवारांनी **दिनांक १३.०४.२०२६ पर्यंत** संबंधित विभाग/कार्यालयात व्यक्तिश: उपस्थित राहून अस्थायी नियुक्तीचा स्वीकार करणे आवश्यक आहे. **सदर कालावधीत उमेदवारांनी अस्थायी नियुक्ती स्विकारली नाही तर त्यांचे नाव कोणतीही पूर्वसूचना न देता, या विभागाच्या/महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या निवडसूचीतून कमी करण्यात येईल**.

(२) लोकसेवा आयोगाकडे केलेल्या अर्जातील दाव्यांची तपासणी / पडताळणी आयोगाने केलेली नसल्याने, नियुक्ती स्विकारण्यासाठी उपस्थित रहाताना, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सहायक कक्ष अधिकारी (मुख्य) परीक्षा २०२४ साठी देण्यात आलेल्या जाहिरात क्रमांक : १०६/२०२५, दिनांक १९.०५.२०२५ मध्ये नमूद केल्यानुसार वयोमर्यादेची दिनांक ०१.०२.२०२५ रोजीच्या अर्हतेनुसार तसेच शैक्षणिक आणि अन्य अटींची दिनांक ०३.०६.२०२५ किंवा तत्पुर्वीच्या अर्हतेनुसार खाली नमूद केलेली मूळ प्रमाणपत्रे उमेदवारांनी सोबत घेऊन जावीत. नियुक्ती स्विकारण्यासाठी उपस्थित रहाताना सदर प्रमाणपत्रांची साक्षांकित प्रत उमेदवाराजवळ असणे अत्यावश्यक आहे :-

(i) वयोमर्यादा-दिनांक ०१.०२.२०२५ रोजी (प्रस्तुत मुख्य परीक्षेच्या जाहिरातीमध्ये नमुद केल्यानुसार) तसेच प्रस्तुत मुख्य परीक्षेच्या जाहिरातीमधील परिच्छेद ६.२.२ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक:- एसआरव्ही-२०२४/प्र.क्र.३९/कार्या. १२ (सेवा), दि. २०.१२.२०२४ अन्वये कमाल वयोमर्यादेत एकवेळची विशेषबाब म्हणून ०१ वर्ष इतकी शिथिलता देण्यात आली आहे.

(ii) अधिवास : मुख्य परीक्षेच्या जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे

(iii) शैक्षणिक अर्हता: सांविधिक विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने मान्य केलेली समतुल्य अर्हता मुख्य परीक्षेचा अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास किंवा तत्पूर्वी म्हणजेच दिनांक ०३.०६.२०२५ किंवा तत्पूर्वी धारण करणे अत्यावश्यक आहे.

(iv) अंतर्वासिता (INTERNSHIP) निर्धारित केली असेल अशी पदवी धारण करणाऱ्या उमेदवारांनी अंतर्वासिता (INTERNSHIP) मुख्य परीक्षेचे अर्ज स्वीकारणाच्या दिनांकापर्यंत (दिनांक ०३.०६.२०२५ किंवा तत्पुर्वी) पूर्ण केली असेल तरच त्याला पदवीधर समजण्यात येईल.

(v) महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षेची जाहिरात दि. ०९.१०.२०२४ व मुख्य परीक्षेची जाहिरात दि. १९.०५.२०२५ रोजी विज्ञापित केलेली आहे. वि.जा. (अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज. (ड), वि.मा.प्र., आ.दु.घ. व इ.मा.व. प्रवर्गाचा दावा केला असल्यास अशा उमेदवारांच्या बाबतीत शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी-२०१३/प्र.क्र.१८२/विजाभज-१, दिनांक १७ ऑगस्ट, २०१३ अन्वये जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याच्या नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्राचा कालावधी विचारात घेण्यात येईल.

शासन शुध्दीपत्रक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.७६/मावक, दि. ०९.०३.२०२३ अन्वये शासनाकडून जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, संबंधित उमेदवार उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गटात मोडत नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी कालावधी विचारात घेण्यात यावा.

(vi) प्रस्तुत मुख्य परीक्षेच्या जाहिरातीमधील परिच्छेद ६.४.४ नुसार मराठी ज्ञान आवश्यक आहे. सदर बाब संबंधित उमेदवारांच्या दहावीच्या गुणपत्रकाआधारे किंवा महाविद्यालयाच्या प्राचार्य/विभाग प्रमुखांच्या प्रमाणपत्राआधारे तपासून घेण्यात यावी.

(vii) खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरीता खुल्या प्रवर्गातील महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांनी नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट महिला व बाल विकास विभागाच्या दि. ०४.०५.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आली आहे. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील

महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करू इच्छीणाऱ्या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याबाबतच्या तरतुदी लागु राहतील. (इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागाच्या दि. ३१.०१.२०२० च्या शासन निर्णयानुसार)

(Viii) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: बीसीसी/प्र.क्र.७५/१६-क, दि. २७.०२.२०२४ अन्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गाकरीता आरक्षण विहित करण्यात आले असून शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-२०२४/प्र.क्र.७५/आरक्षण-५, दि. २८.०६.२०२४ व दि. ०५.०७.२०२४ मध्ये दिलेल्या सूचनेनुसार जात प्रमाणपत्र आणि नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(३) उमेदवारांच्या पात्रता विषयक म्हणजेच शिक्षण, वय, खेळाडू, दिव्यांग, जाती विषयक प्रमाणपत्र, इत्यादीबाबतच्या मूळ प्रमाणपत्रांची पडताळणी आयोगाने तसेच या विभागाने केली नसल्यामुळे या सर्व बाबतीत नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी पडताळणी करणे आवश्यक आहे. प्रस्तुत उमेदवारांचे शिक्षण, वय, खेळाडू असल्यास त्याबाबतची प्रमाणपत्रे, शारीरिक अपंग असल्यास त्याबाबतची प्रमाणपत्रे, इत्यादीबाबतची मूळ प्रमाणपत्रेही अधिसूचनेत नमूद केलेल्या अर्हतेनुसार आहेत किंवा कसे? हे नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी उमेदवारांची तात्पुरती नियुक्ती करतानाच प्रथम तपासून पहावीत. आयोगाला केलेल्या अर्जातील दाव्याच्या तपासणीसाठी आवश्यक व योग्य ती प्रमाणपत्रे उमेदवार नियुक्ती प्राधिकाऱ्यांना सादर करु शकला नाही तर, उमेदवाराची नियुक्ती करण्यात येणार नाही व उमेदवाराची शिफारस आपोआप रद्द समजण्यात येईल व तसे आयोगाला कळविण्यात येईल.

(४) अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडू आरक्षणाचा दावा केलेल्या व प्रस्तुत पदावर शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक : राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ०१.०७.२०१६, रोजीच्या शासन निर्णयानुसार तसेच, त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक १८.०८.२०१६ रोजीच्या शुध्दीपत्रकातील तरतूदीनुसार, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण १७१७/प्र.क्र.३९/क्रीयुसे-२, दिनांक १७.३.२०१७, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण १७१७/प्र.क्र.३९/क्रीयुसे-२, दिनांक २७.३.२०१७, शासन शुध्दीपत्रक क्रमांक : राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १०.१०.२०१७, व शासन शुध्दीपत्रक क्रमांक : राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १५.११.२०१७, शासन शुध्दीपत्रक क्रमांक : राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि. ११.०३.२०१९ व दि. २४.१०.२०१९, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२, **दिनांक ३०.०६.२०२२** रोजीच्या तरतूदीनुसार आणि तदनंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार सहायक कक्ष अधिकारी, गट-ब (अराजपत्रित) पदांसाठी निश्चित केलेली

क्रीडा विषयक अर्हता व क्रीडा प्रमाणपत्र पूर्व परीक्षेच्या अर्ज स्विकारण्याच्या दिनांक ०४.११.२०२४ रोजी किंवा तत्पूर्वी धारण करणे आवश्यक राहील. तसेच त्यासंदर्भातील संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल नियुक्तीपुर्वी शासनाकडे सादर करणे आवश्यक राहील. सदर क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल शासन स्तरावरुन तपासूनच संबंधित उमेदवाराच्या सहायक कक्ष अधिकारी पदावरील नियुक्तीबाबतची कार्यवाही सर्व संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकाच्या दिनांक ०४.११.२०२४ रोजीचा किंवा तत्पूर्वीचा क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल सादर करण्याच्या अधीन करण्यात आलेली आहे. त्यानुसार गट-ब (अराजपत्रित) पदाकरीता ग्राह्य असल्याबाबतच्या संबंधित विभागीय उपसंचालकांच्या वर उल्लेखित विहित दिनांकाच्या पडताळणी अहवालाच्या तपासणीनंतरच गुणवत्ताधारक खेळाडू पदावर शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्यात यावी.

(४.१) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दि. ३०.०६.२०२२ नुसार “खेळाडू प्रवर्गातून शिफारस प्राप्त झालेल्या उमेदवारांची क्रीडा प्रमाणपत्रे नियुक्ती प्राधिकारी यांनी पुर्नपडताळणीसाठी आयुक्त क्रीडा व युवक सेवा, पुणे यांच्याकडे पाठवावीत. आयुक्त क्रीडा व युवक सेवा, पुणे यांनी वैध खेळाडू प्रमाणपत्र पडताळणी अहवाल दिल्याशिवाय संबंधित उमेदवारास शासन सेवेत नियुक्ती दिली जाणार नाही. याबाबत संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांनी दक्षता घ्यावी.” तसेच शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय दि. ०५.०९.२०२५ अन्वये राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५ % आरक्षण धोरणात केलेल्या सुधारणाही विचारात घेण्यात याव्यात.

(५) दिव्यांगांसाठी राखीव असलेल्या पदावर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची प्रमाणपत्रे वैद्यकीय मंडळाकडून तपासून घेण्याच्या अधीन राहून त्यांची शासनाकडे शिफारस करण्यात आलेली आहे. तसचे सा.प्र.वि, शा.नि. क्र अपंग १००३/प्र.क्र.१२७/२००३/१६-अ, दिनांक ०६.०५.२००४ मधील बाब क्र. (६) नुसार त्यांच्या नेमणुकीपूर्वी उमेदवार संबंधित पदावर नियुक्तीसाठी सक्षम आहे किंवा नाही याची वैद्यकीय मंडळाकडून तपासणी केल्यानंतर ते नेमणुकीस पात्र ठरतील. दिव्यांगांसाठी राखीव असलेल्या पदावर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक : अप्रकि २०१२/प्र.क्र.२९७/आरोग्य-६, दिनांक ०६.१०.२०१२ मधील आदेशानुसार SADM या नवीन संगणक प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगतवाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक : अप्रकि २०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दिनांक १४.०९.२०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in या संगणकीय प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आलेले नवीन नमुन्यातील किमान ४०% कायमस्वरुपी दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र शासनास नियुक्तीपूर्वी सादर करणे अनिवार्य राहील. तसेच दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. दिव्यांग-२०१८/प्र.क्र.११४/१६-

अ, दिनांक २९ मे, २०१९ तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार आरक्षणासंदर्भातील कार्यवाही करण्यात यावी. तसेच खाली नमूद करण्यात आलेल्या शासन निर्णय/परिपत्रकांमधील सूचनांनुसार कार्यवाही करण्यात येईल :-

(अ) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : अपंग १००३/प्र.क्र.१२७/ २००३/१६-अ, दिनांक० ६.०५.२००४

(ब) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक : न्यायाप्र-२००९/प्र.क्र.९/सुधार-३, दिनांक ०३.०८.२०१०

(क) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,शासन परिपत्रक क्रमांक : अपंग २००९/प्र.क्र.१३३/सुधार-३, दिनांक १४.०१.२०११

(ड) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक : अप्रकि २०१२/प्र.क्र.२९७/आरोग्य-६, दिनांक ०६.१०.२०१२

(६) अनाथ व्यक्तींचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्र. अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का.०३, दि. ०६.०४.२०२३, दि. १०.०५.२०२३ अनुसार तसेच शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

(७) ज्या मागासवर्गीय उमेदवारांची खुल्या प्रवर्गातील पदावर शिफारस करण्यात आली असेल त्या उमेदवारांबाबत सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक : सीबीसी-१०/२००४/प्र.क्र.५७०/मावक-५, दिनांक १६.५.२००७ मधील सूचनेनुसार कार्यवाही करण्यात येईल.

(८) (अ) मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांच्याबाबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी व जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : बीसीसी-२०१२/प्र.क्र.३३२/१२/१६-ब, दिनांक १८.०५.२०१३ मध्ये नमूद सूचनांनुसार नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी कार्यवाही करणे अपेक्षित असून, मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या पदावरील नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२.१२.२०११ मधील तरतूदीनुसार जात वैधता प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येईल. सदरहू उमेदवाराकडे जात पडताळणी समितीकडून प्राप्त करुन घेतलेले जाती वैधता प्रमाणपत्र असल्यास त्याने नियुक्तीसाठी हजर होताना ते सादर करावे. नसल्यास त्याने जाती प्रमाणपत्र पडताळणीसाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे/प्रमाणपत्रे नियुक्ती प्राधिकाऱ्यास तात्काळ उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

(ब) नियुक्ती प्राधिकाऱ्याने विनाविलंब सदर कागदपत्रे संबंधित जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे पाठवावी. याशिवाय संबंधित उमेदवाराने देखील स्वतंत्रपणे जात पडताळणी समितीकडे त्याच्याकडे असलेले कागदपत्रे/पुरावे सादर करुन पाठपुरावा

करावा. जात पडताळणी समितीकडून जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच, शिफारस करण्यात आलेल्या सर्व उमेदवारांचे जाती दावे (जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र) संचालक, समाजकल्याण संचालनालय, पुणे यांच्याकडून व जमातीचे दावे (जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याकडून ते संबंधित समितीकडून निर्गमित करण्यात आल्याची खातरजमा करुन घेण्याची कार्यवाही देखील नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी करावी.

(क) शिफारस करण्यात आलेल्या अनुसुचित जमातीच्या उमेदवारांचे दावे आयुक्त, आदिवासी विकास व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याकडून तपासून घेण्याबाबत तसेच अन्य सर्व मागासवर्गीय उमेदवारांचे जाती/जमातीचे दावे नियुक्तीपूर्वी संचालक, समाज कल्याण संचालनालय, पुणे यांचेकडून तपासून घेण्यात यावे.

(९) सहायक कक्ष अधिकारी पदावर नामनिर्देशनाने नियुक्त होणाऱ्या उमेदवाराकडे सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक १९.०३.२००३ मधील तरतुदीनुसार (अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा B किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा (ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र यापैकी एक प्रमाणपत्र किंवा माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाच्या शासन निर्णय क्रमांक : मातंस २०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ०४.०२.२०१३ व शासन पूरकपत्र क्र.मातंसं २०१२/प्र.क्र.२७०/३९, दिनांक ०८.०१.२०१८ मध्ये नमूद केल्यानुसार आवश्यक संगणक अर्हता आवश्यक आहे. तथापि, नियुक्ती स्विकारण्याच्या वेळेस सदर प्रमाणपत्र/अर्हता उमेदवारांकडे नसल्यास नियुक्ती स्विकारल्यापासून दोन वर्षाच्या आत उमेदवाराने उपरोक्त शासन निर्णयातील नमूद संस्थेचे संगणक ज्ञानाच्या अर्हतेचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. या विहित कालावधीत उमेदवाराने सदर प्रमाणपत्र सादर न केल्यास **शासन अधिसूचना** क्र.एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४६२/कार्या.१२, **दिनांक २८.०५.२०१८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल ही बाब उमेदवाराच्या नियुक्ती आदेशात स्पष्टपणे नमूद करण्यात यावी.**

(१०) हिंदी व मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर शिफारसप्राप्त उमेदवार अगोदर उपरोक्त नमुद परीक्षा उत्तीर्ण झाला नसेल किंवा त्याला सदरहू परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर, सदरहू उमेदवारांना ती परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

(११) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १३.०८.२०१४ तसेच अन्य अद्यावत शासन निर्णयामधील तरतूदीआधारे सदर सहायक कक्ष अधिकाऱ्यांची शिफारशी करण्यात येत आहेत. शासनाने यासंदर्भात वेळोवेळी केलेल्या सूचना विचारात घेता सहायक कक्ष अधिकाऱ्यांच्या पदाकरिता अमागास समांतर आरक्षित पदांसाठी शिफारसपात्र ठरलेले उमेदवार हे प्रत्यक्षात खुल्या (अराखीव) प्रवर्गातीलच उमेदवार आहेत याची त्यांच्या शाळा/ महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्याआधारे तसेच अन्य

तदनुषंगिक दस्तऐवजा आधारे नियुक्तीपूर्वी खात्री व पडताळणी करुनच त्यांना सहायक कक्ष अधिकारी पदावर नियुक्ती देण्यात यावी.

(१२) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारसप्राप्त ठरलेल्या **५५ उमेदवारांनी** मुख्य परीक्षेच्यावेळी सादर केलेल्या ओळखपत्राच्या प्रती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने उपलब्ध करुन दिल्या आहेत. ते प्रत्येक उमेदवारांच्या नियतवाटप केलेल्या विभागात उमेदवारांच्या प्रोफाईल सोबत नियुक्ती प्राधिकाऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. उमेदवारांच्या आवेदनपत्राची संगणकीय प्रत/अर्जातील फोटो यावरुन प्रत्यक्षात रुजू झालेला उमेदवार तोच आहे का, तसेच मुख्य परीक्षेच्यावेळी सादर केलेल्या ओळखपत्रावरुन अर्जातील उमेदवाराचा फोटो व स्वाक्षरी, ओळखपत्रातील फोटो व स्वाक्षरी त्याच उमेदवाराची आहे का, सादर केलेले ओळखपत्र अधिकृत आहे का, याची नियुक्तीपूर्वी सखोल तपासणी करावी. तसेच उमेदवारांनी परीक्षेच्यावेळी सादर केलेल्या ओळखपत्राची वैधता संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांकडून तपासून घेण्यात यावी. तद्नंतरच संबंधित उमेदवाराची सहायक कक्ष अधिकारी पदावर नियुक्ती करण्यात यावी.

(१३) साक्षांकन नमुना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, नियतवाटप करण्यात आलेल्या उमेदवारांनी तो तेथून डाऊनलोड करावा. सदर साक्षांकन नमुना पूर्णपणे भरुन उमेदवाराने त्याचे नियतवाटप करण्यात आलेल्या विभाग/कार्यालयात हजर होताना सादर करावा. हजर झालेल्या उमेदवारांकडून साक्षांकन नमुने प्राप्त करुन घेतल्यानंतर उमेदवारांच्या पूर्व-चारित्र्याची पडताळणी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : चापअ १००८/ प्र.क्र.२१४/०८/१६-अ, दिनांक ०९.०१.२००९ मधील तरतुदी विचारात घेऊन पोलीस विभागाकडून करुन घ्यावी व अहवाल प्रतिकूल असल्यास, प्रस्तुत शासन निर्णयातील सूचनांनुसार संबंधित उमेदवारांच्याबाबत तातडीने कार्यवाही करुन तसे या विभागास अवगत करावे. **"प्रस्तुत उमेदवारांची नियुक्ती त्यांच्या पूर्व-चारित्र्याची पडताळणी करण्यापूर्वी करण्यात येणार असल्यामुळे त्यांची नियुक्ती पुढील आदेश होईपर्यंत करण्यात आली आहे व सेवासमाप्ती पूर्वसूचना न देता करण्यात येईल."** असा स्पष्ट उल्लेख उमेदवारांच्या नियुक्तीच्या आदेशात करण्यात यावा. उमेदवाराच्या चारित्र्य पडताळणी संदर्भात सामान्य प्रशासन विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक : चापअ १०१२/प्र.क्र.६३/१६-अ, दिनांक २६.०८.२०१४ मधील सूचनादेखील विचारात घेण्यात याव्यात.

(१४) प्रस्तुत परीक्षेचा अंतिम निकाल मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण व मा. उच्च न्यायालय येथे दाखल करण्यात आलेल्या विविध मुळ अर्ज/याचिका प्रकरणी होणाऱ्या अंतिम निकालाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे, ही बाब विचारात घेऊन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सरळसेवा सहायक कक्ष अधिकारी (मुख्य) परीक्षा-२०२४ मधून उमेदवारांची शिफारस केली आहे याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(१५) सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना क्र.टीआरएन-२०११/ प्र.क्र.२८४/११/१२-अ, व सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.यशदा-२०२१/प्र.क्र.४४/१२-अ, दिनांक २२.०९.२०२२ नुसार सर्व संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना राज्य प्रशिक्षण धोरणानुसार

(पायाभूत) प्रशिक्षण अनिवार्य आहे. त्यानुसार प्रशिक्षणासाठी नामनिर्देशित करण्यात आलेले अधिकारी/कर्मचारी यांनी प्रशिक्षणासाठी सक्तीने उपस्थित राहणे गरजेचे असून, प्रशिक्षणासाठी नामनिर्देशित करण्यात आलेले अधिकारी/कर्मचारी यांना संबंधित विभागप्रमुख यांनी कार्यमुक्त करणे देखील सक्तीचे आहे.

(१६) **सहायक कक्ष अधिकाऱ्यांची मंत्रालयीन विभाग व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील ५५ पदे भरावयाची असल्याचे परीक्षेच्या जाहिरातीत स्पष्ट करण्यात आले होते. यास्तव नियतवाटप केलेल्या उमेदवारांची अन्य जिल्ह्यामध्ये नियुक्ती देण्याची विनंती मान्य केली जाणार नाही व या संदर्भातील अर्जाची दखल घेतली जाणार नाही. तसेच, अन्य विभाग/कार्यालयात पुर्नवाटप करण्याबाबतच्या विनंतीचाही विचार करण्यात येणार नाही.**

(१७) मुंबईबाहेरील उमेदवारांनी त्यांच्या मुंबईतील निवासस्थानाबाबतची व्यवस्था स्वत:च करावयाची असून त्यासाठी **मुदतवाढ दिली जाणार नाही.**

(१८) अस्थायी नियुक्ती स्विकारण्यासाठी उपस्थित रहाण्याकरीता लागणारा प्रवास खर्च उमेदवाराने स्वत:च सोसावयाचा आहे.

(१९) उमेदवाराने नियुक्ती स्विकारल्यानंतर सोबत जोडलेला रुजू अहवाल या कार्यासनास तात्काळ सादर करावा.

(२०) विभाग/कार्यालयाने नियुक्तीसाठी रुजू होणाऱ्या उमेदवारांना तात्पुरती नियुक्ती देण्यात यावी व त्यासोबतचे प्रतिवेदन कोणत्याही परिस्थितीत नियुक्तीनंतर तात्काळ या विभागाकडे पाठविण्यात यावे.

(२१) उक्त नमूद अटींची पूर्तता न झाल्यास उमेदवारांच्या सेवा समाप्त करण्यात येतील.

सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०३१२१८३८०४०४०७ असा आहे. सदर ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Digitally signed by GAJANAN SAHADEO PARAB
Date: 2026.03.12 18:40:46 +05'30'

(ग.स.परब)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

कार्यालयांसाठी सहपत्रे

१) उमेदवारांच्या नावाची यादी (उमेदवारांचा भ्रमणध्वनी व ई मेल क्रमांकासह)

२) उमेदवाराने आयोगास सादर केलेल्या आवेदनपत्राची संगणकीय प्रत व ओळखपत्राची प्रत,

३) सरळसेवा सहायक कक्ष अधिकारी (मुख्य) परीक्षा-२०२४ साठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिलेल्या जाहिरातीची प्रत **(अधिसूचना),**

४) प्रतिवेदन नमूना (उमेदवार दिनांक १३.०४.२०२६ पर्यंत विभागात हजर न झाल्यास उमेदवाराच्या आवेदनपत्राच्या संगणकीय प्रतीसह) कोणत्याही परिस्थितीत दिनांक १५.०४.२०२६ पर्यंत या विभागास पाठविण्यात यावा.

प्रत :-

१) सह सचिव/उप सचिव/अवर सचिव (आस्थापना), संबंधित मंत्रालयीन विभाग, यांना उपरोक्त सहपत्रांसह
२) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.
३) सर्व संबंधित उमेदवार, यांना रुजू अहवालाचा नमुना प्रतीसह (ई मेल द्वारे)
४) सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन/प्रशा-३) (संग्रहार्थ)

सरळसेवा सहायक कक्ष अधिकारी (मुख्य) परीक्षा २०२४ मधून मंत्रालयीन विभाग व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयात करावयाचे उमेदवारांचे नियतवाटप

सामान्य प्रशासन विभाग, शासन ज्ञापन क्र. सकनि ११२६/प्र.क्र. ४०/प्रशा-३ (१४-अ),

दिनांक : १२ मार्च, २०२६ सोबतचे (विवरणपत्र "अ")

अ.क्र.	म.लो.आ. शिफारस क्रमांक	Name	उमेदवाराचा मुळ प्रवर्ग	म.लो.आ. शिफारस प्रवर्ग	विभागाचे नाव
1	1	Tambe Nilesh Dilip	Unreserved	OPEN-General-1	उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग
2	2	Ranpise Shubham Rajaram	SEBC	OPEN-General-2	मृद व जलसंधारण विभाग
3	3	Phadatare Raj Sanjay	SEBC	OPEN-General-3	आदिवासी विकास विभाग
4	4	VAIBHAV RAJENDRA SARADE	SEBC	OPEN-General-4	जलसंपदा विभाग
5	5	Survase Sourabh kalyan	OBC	OPEN-General-5	वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
6	6	JADHAV JITENDRA GANAPATI	SEBC	OPEN-General-6	जलसंपदा विभाग
7	7	Patil Pranav Prakash	OBC	OPEN-General-7	गृहनिर्माण विभाग
8	8	BURAGUTE MANOJ MUKUND	SEBC	OPEN-General-8	शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
9	9	BHOSALE AVDHUT SURYAKANT	Unreserved	OPEN-General-9	कृषि व पदुम विभाग
10	10	MIRZAPURE OMKAR ANANDRAO	OBC	OPEN-General-10	वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
11	11	Mane Harshvardhan Shashikant	Unreserved	OPEN-General-11	सार्वजनिक आरोग्य विभाग
12	12	AHIRE SANKET HARIDAS	OBC	OPEN-General-12	सार्वजनिक बांधकाम विभाग
13	13	Hake Rohit Anil	NT-C	OPEN-General-13	सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
14	14	SHINDE PRATIK SANJAY	OBC	OBC-General-1	पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
15	15	GITE PRAMOD KASHIRAM	NT-D	NT-D-General-1	पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग
16	16	HAJGUDE AKSHAY ASHOK	SEBC	SEBC-General-1	महसूल व वन विभाग
17	17	DANGE PRASHANT HARISHCHANDRA	SEBC	SEBC-General-2	ग्राम विकास विभाग
18	18	ULAPE VISHAL DHANAJI	SEBC	SEBC-General-3	शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
19	19	SHINDE PRITAM VILAS	OBC	OBC-General-2	सार्वजनिक बांधकाम विभाग

अ.क्र.	म.लो.आ. शिफारस क्रमांक	Name	उमेदवाराचा मुळ प्रवर्ग	म.लो.आ. शिफारस प्रवर्ग	विभागाचे नाव
20	20	MALI SAHIL SHAHAJI	OBC	OBC-General-3	कृषि व पदुम विभाग
21	21	MANE KIRAN ASHOK	NT-C	NT-C-General-1	सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
22	22	Nanaware Amruta Bramhadev	SEBC	OPEN-Female-1	आदिवासी विकास विभाग
23	23	LONKAR SURAJ VIKAS	OBC	OBC-General-4	मृद व जलसंधारण विभाग
24	24	AUTE MAMTA SHASHIKANT	SEBC	OPEN-Female-2	वित्त विभाग
25	25	Agrawal Aachal Dattaprasad	EWS	OPEN-Female-3	शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
26	26	JADHAV RUTUJA RAMBHAU	Unreserved	OPEN-Female-4	जलसंपदा विभाग
27	27	FUNDE PRAMOD RAJENDRA	NT-D	NT-D-General-2	जलसंपदा विभाग
28	28	CHAUDHARI PRADNYA LINGAPPA	EWS	OPEN-Female-5	जलसंपदा विभाग
29	29	JADHAV PRADNYA HANMANTRAO	SEBC	OPEN-Female-6	कृषि व पदुम विभाग
30	30	Kagale Sakshi Sunil	EWS	OPEN-Female-7	ग्राम विकास विभाग
31	31	SARAVADE KAPIL VIKAS	SC	SC-General-1	जलसंपदा विभाग
32	32	PATHAN IRFAN KHAJAMINYA	EWS	EWS-General-1	जलसंपदा विभाग
33	33	Juned Naser Kazi	EWS	EWS-General-2	गृह विभाग
34	34	INAMDAR SUMIT MAHESH	EWS	EWS-General-3	कृषि व पदुम विभाग
35	35	MOHITE SURAJ SIDDHARTH	SC	SC-General-2	गृह विभाग
36	36	Harshad Prabhakar Bagul	ST	ST-General-1	शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
37	37	SUTAR UTKARSHA UTTAM	OBC	OBC-Female-1	सार्वजनिक बांधकाम विभाग
38	38	MEHETRE PRIYANKA BHAUSAHEB	OBC	OBC-Female-2	अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
39	39	Naik Shruti Chandrakant	NT-D	NT-D-Female-1	सार्वजनिक बांधकाम विभाग
40	40	Pranay Jalindar Abnave	SC	SC-General-3	अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
41	41	GAWADE MITALI BHARAT	SEBC	SEBC-Female-1	सार्वजनिक आरोग्य विभाग
42	42	Kadage Srushti Nitin	EWS	EWS-Female-1	आदिवासी विकास विभाग
43	43	GOSAVI AKASH MACHINDRA	NT-B	NT-B-General-1	वित्त विभाग
44	44	Ashish Ekanath Nagane	Unreserved	Divyang-Locomotor disability-1	गृह विभाग
45	45	Patil Shital Mahaveer	EWS	EWS-Female-2	सार्वजनिक बांधकाम विभाग

अ.क्र.	म.लो.आ. शिफारस क्रमांक	Name	उमेदवाराचा मुळ प्रवर्ग	म.लो.आ. शिफारस प्रवर्ग	विभागाचे नाव
46	46	MANKAR GAYATRI SANJAY	SC	SC-Female-1	नगर विकास विभाग
47	47	KAMTE KRISHNAKANT RAJARAM	NT-B	NT-B-General-2	महाराष्ट्र लोकसेवा आयोग
48	48	CHOUDHARI MINAL ASHOK	SC	SC-Female-2	दिव्यांग कल्याण विभाग
49	49	ADATRAO SHUBHAM NAVANATH	ST	ST-General-2	अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
50	50	THOMBARE SHRUTI BALKRISHANA	ST	ST-Female-1	विधि व न्याय विभाग
51	51	KSHIRSAGAR SHUBHAM SHRIKANT	SEBC	Divyang-Locomotor disability-2	गृह विभाग
52	52	MORE ROHAN RAMESH	SEBC	OPEN-Sports-1	महसूल व वन विभाग
53	53	Maske Abhishek Krishna	OBC	OBC-Sports-1	उच्च व तंत्र शिक्षण विभाग
54	54	CHAPLE PIYUSH SANJAY	OBC	-Orphan - Type A/B-1	उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग
55	55	LONDHE SMITA VINAYAK	SC	SC-Sports-1	जलसंपदा विभाग

<u>उमेदवारांसाठी रुजू अहवाल</u>

उमेदवाराचे नांव	:	
उमेदवाराची जन्मतारीख	:	
उमेदवाराची शैक्षणिक अर्हता	:	
उमेदवाराचा शिफारस क्रमांक	:	
उमेदवाराचा स्वत:चा मूळ प्रवर्ग	:	
म.लो.आ. ने ज्या प्रवर्गातून शिफारस केली तो प्रवर्ग	:	
उमेदवाराचा भ्रमणध्वनी क्रमांक	:	
उमेदवाराचा ई-मेल आय.डी.	:	

प्रति,

अवर सचिव [कार्यासन प्रशा-३ (१४-अ)],
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, ५ वा मजला, खोली क्रमांक ५५७ (विस्तारित)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२.

विषय: सरळसेवा सहायक कक्ष अधिकारी (मुख्य) परीक्षा २०२४ मधून मंत्रालयीन विभागात/ महाराष्ट्र लोकसेवा आयोगात रुजू झाल्याचा अहवाल

महोदय,

मी खाली सही करणार श्री/श्रीमती ____________________________________

नमूद करतो/करते की, आपले ज्ञापन क्रमांक सकनि ११२६/प्र.क्र.४०/प्रशा-३ (१४-अ), दिनांक १२.०३.२०२६, नुसार मी विभाग/कार्यालयात दिनांक ________________ रोजी रुजू झालो/झाले. सदरहू माहिती आपणास उचित कार्यवाहीसाठी कळविण्यात येत आहे.

आपला/आपली विश्वासू,

( )
उमेदवाराची सही व नांव

<u>**टीप :**</u>

(१) नियतवाटप केलेल्या विभाग/कार्यालयात हजर झाल्यानंतर उमेदवाराने तात्काळ वरील पत्र या विभागाकडे (सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन १४-अ) पाठवावे. अन्यथा त्यांना दिलेली नियुक्ती त्यांनी स्विकारली नाही असे समजून योग्य ती पुढील कार्यवाही केली जाईल याची त्यांनी नोंद घ्यावी

(२) ज्ञापनामध्ये उमेदवाराच्या नावापुढे दर्शविलेला क्रमांक हा त्याचा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडील शिफारस यादीतील क्रमांक आहे. तो क्रमांक वर दर्शविलेल्या ठिकाणी नमूद करावा.

नियतवाटप केलेल्या आयोग पुरस्कृत उमेदवारासंबंधी प्रतिवेदन

क्रमांक : (विभाग/कार्यालयाचे नांव व पत्ता)

दिनांक :

प्रति,

अवर सचिव [कार्यासन प्रशा-३ (१४-अ)],
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,
५ वा मजला, खोली क्रमांक ५५७ (विस्तारित)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२.

विषय :- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांची सहायक कक्ष अधिकारी पदावर नियुक्ती सरळसेवा सहायक कक्ष अधिकारी (मुख्य) परीक्षा २०२४

संदर्भ :- सामान्य प्रशासन विभागाचे क्र.सकनि ११२६/प्र.क्र.४०/प्रशा-३ (१४-अ), दिनांक १२.०३.२०२६ चे ज्ञापन.

संदर्भाधिन उमेदवारांबाबतचे प्रतिवेदन पुढीलप्रमाणे आहे :-

(अ) नियुक्ती स्विकारणारे उमेदवार

अ.क्र.	उमेदवाराचे नांव	शिफारस क्रमांक

(ब) नियुक्ती न स्विकारणारे उमेदवार

अ.क्र.	उमेदवाराचे नांव	शिफारस क्रमांक

वरील (अ) येथे दर्शविलेल्या उमेदवारांनी योग्य ती प्रमाणपत्रे सादर केली असून ते सहायक कक्ष अधिकारी पदावरील नियुक्तीकरीता आवश्यक त्या सर्व अटी पूर्ण करीत असल्याने त्यांच्या नेमणुकीबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले असून त्यांच्या प्रती सोबत जोडण्यात आल्या आहेत. तसेच विहित कालावधीत नियुक्ती न स्विकारणाऱ्या (ब) येथे दर्शविलेल्या उमेदवारांचे मूळ अर्ज (उमेदवाराने आयोगास सादर केलेल्या आवेदनपत्राची संगणकीय प्रत) सोबत परत पाठविण्यात येत आहेत.

सहपत्र :- वरीलप्रमाणे (सही व पदनाम)

अ.क्र.	मंत्रालयीन विभागातील कार्यालय यांचे पत्ते
१	अवर सचिव (आस्थापना), सामान्य प्रशासन विभाग, ५ वा मजला, दालन क्र.५५३ (विस्तार), मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२. दुरध्वनी क्र.२२८८१८९७
२	अवर सचिव (आस्थापना), गृह विभाग, २ रा मजला, मंत्रालय, मुख्य इमारत , मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२. दूरध्वनी क्र. २२०२५०८८, २२७९३८५८
३	अवर सचिव (आस्थापना), महसूल व वन विभाग, पहिला मजला, मंत्रालय, मुख्य इमारत, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२. दुरध्वनी क्र. २२०४८५०४/२२७९३८००
४	अवर सचिव (आस्थापना), कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, ५ वा मजला, दालन क्र.५२२ (विस्तार), मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२. दुरध्वनी क्र.२२७९३६९०, २२८१३३४७
५	अवर सचिव (आस्थापना), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग , दालन क्र.४४० (विस्तार), ४ था मजला, मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२. दुरध्वनी क्र. २२७९३१६८, २२०४६२५९
६	अवर सचिव (आस्थापना), नगर विकास विभाग, ४ था मजला, मंत्रालय मुख्य इमारत , मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२. दूरध्वनी क्र. २२७९४१९७, २२७९४१९४, २२८२०४५५
७	अवर सचिव (आस्थापना), वित्त विभाग, ३ रा मजला, दालन क्र.३१९ (विस्तार), मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२. दुरध्वनी क्र.२२७९३२६९, २२८२६८११
८	अवर सचिव (आस्थापना), सार्वजनिक बांधकाम विभाग, २ रा मजला, दालन क्र.२६० (विस्तार), मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२. दुरध्वनी क्र.२२७९३८४७, २२८१४९७१
९	अवर सचिव (आस्थापना), जलसंपदा विभाग, ३ रा मजला, मंत्रालय, मुख्य इमारत , मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२. दूरध्वनी क्र. २२७९४१७६
१०	अवर सचिव (आस्थापना), विधि व न्याय विभाग, ५ वा मजला, मंत्रालय, मुख्य इमारत, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२. दुरध्वनी क्र.२२७९३६१०, २२०२८५००
११	अवर सचिव (आस्थापना), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, दालन क्र.१२० (विस्तार), पहिला मजला, मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२. दुरध्वनी क्र.२२७९३७२१, २२८१०३९४
१२	अवर सचिव (आस्थापना), ग्राम विकास विभाग, मंत्रालय, विस्तार इमारत पोटमाळा, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२. दुरध्वनी क्र.२२७९३२३७
१३	अवर सचिव (आस्थापना), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, २ रा मजला, दालन क्र.२१९ (विस्तार), मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२. दुरध्वनी क्र.२२७९३०५०
१४	अवर सचिव (आस्थापना), नियोजन विभाग, ६ वा मजला, दालन क्र.६९८ (विस्तार), मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२. दुरध्वनी क्र.२२७९४११६, २२०२२५९६
१५	अवर सचिव (आस्थापना), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, पहिला मजला, दालन क्र.१५६ (विस्तार), मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२. दुरध्वनी क्र.२२७९३०२५, २२८२०२०१
१६	अवर सचिव (आस्थापना), संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, विस्तार इमारत पोटमाळा, दालन क्र.१५६ (विस्तार), मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२. दुरध्वनी क्र.२२७९३४१८
१७	अवर सचिव (आस्थापना), गृहनिर्माण विभाग, ३ रा मजला, मंत्रालय मुख्य इमारत , मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२. दूरध्वनी क्र.२२७९३८६३
१८	अवर सचिव (आस्थापना), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, ७ वा मजला, क्रॉफर्ड मार्केट समोर, मुंबई ४०० ००१. दूरध्वनी क्र.२२६१६७०२, २२६१६७०१

१९	अवर सचिव (आस्थापना), सार्वजनिक आरोग्य विभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, शासकीय इमारत, १० वा मजला, क्रॉफर्ड मार्केट समोर, मुंबई ४०० ००१. दूरध्वनी क्र. २२६१७५१०- विस्तार क्र.२१२
२०	अवर सचिव (आस्थापना), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, शासकीय इमारत, ९ वा मजला, क्रॉफर्ड मार्केट समोर, मुंबई ४०० ००१. दूरध्वनी क्र.२२६२६५१२
२१	अवर सचिव (आस्थापना), आदिवासी विकास विभाग, पहिला मजला, मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२. दुरध्वनी क्र.२२७९३०३१
२२	अवर सचिव (आस्थापना), पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासन इमारत, मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२. दूरध्वनी क्र.२२८७३७५५, २२७९३१३१
२३	अवर सचिव (आस्थापना), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, ३ रा मजला, दालन क्र.३१७ (विस्तार), मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२. दुरध्वनी क्र.२२७९३६४२
२४	अवर सचिव (आस्थापना), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ४ था मजला, दालन क्र.४३९ (विस्तार), मंत्रालय , मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२. दुरध्वनी क्र.२२७९३९१४
२५	अवर सचिव (आस्थापना), महिला व बाल विकास विभाग, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२. दूरध्वनी क्र.२२७९४१४१, २२८२४९६६
२६	अवर सचिव (आस्थापना), कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभाग, २ रा मजला, मंत्रालय मुख्य इमारत, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२. दूरध्वनी क्र. २२७९३९६७/२२०४८३०६/२२०४७२३६
२७	अवर सचिव (आस्थापना), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, ७ वा मजला मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२. दुरध्वनी क्र.२२७९४१८३/२२०२५६०८
२८	अवर सचिव (आस्थापना), अल्पसंख्याक विकास विभाग, ७ वा मजला, दालन क्र.७०१ (विस्तार), मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२. दुरध्वनी क्र.२२०२५४०८
२९	अवर सचिव (आस्थापना), मराठी भाषा विभाग, मंत्रालयासमोर, ८ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२. दूरध्वनी क्र.२२०२५९३३/२२७९४१७०
३०	अवर सचिव (आस्थापना), इतर मागास बहुजन कल्याण विभाग, १ ला मजला, मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
३१	अवर सचिव (आस्थापना), मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, विस्तार इमारत पोटमाळा, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२. दुरध्वनी क्र.२२७९३२३७
३२.	अवर सचिव (आस्थापना), दिव्यांग कल्याण विभाग, मित्तल टॉवर, A विंग, ३ रा मजला, नरीमन पॉईट, मुंबई-४०००२१ दुरध्वनी क्र. ४०१४५१४५
३३	अवर सचिव (आस्थापना), महाराष्ट्र लोकसेवा आयोग, त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४

महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र लोकसेवा आयोग

त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सेक्टर ११, सरोवर विहार समोर, बेलापूर सीबीडी, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००

Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

@mpsc_office @official_mpsc

क्रमांक: सीएमए-०४२३/सीआर-१६०/२०२३/जाहिरात **जाहिरात क्रमांक : ०४८/२०२४**

महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - २०२४

महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांतर्गत खालील संवर्गातील **एकूण ४८० पदांच्या** भरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - २०२४, रविवार, दिनांक ०५ जानेवारी, २०२५** रोजी महाराष्ट्रातील एकूण ३७ जिल्हा केंद्रांवर घेण्यात येईल.

२. प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या विविध संवर्गातील पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

१. सहायक कक्ष अधिकारी, गट-ब (अराजपत्रित) :-

१.१ विविध मंत्रालयीन प्रशासकीय विभाग (एकूण ५४ पदे)

प्रवर्ग	अ.जा.	अ.ज.	वि.जा. (अ)	भ.ज. (ब)	भ.ज. (क)	भ.ज. (ड)	इ.मा.व.	वि.मा.प्र.	सा. आणि शै. मागास वर्ग.	आ.दु.घ.	एकूण आरक्षित पदे	अराखीव पदे	एकूण पदे
पदसंख्या	६	३	--	१	१	३	८	--	५	५	३२	२२	५४
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
सर्वसाधारण	३	२	--	१	१	२	५	--	४	३	२१	१४	३५
महिला	२	१	--	--	--	१	२	--	१	२	९	७	१६
खेळाडू	१	--	--	--	--	--	१	--	--	--	२	१	३
दिव्यांग	**एकूण ०२ पदे -** अस्थिव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (Leprosy Cured) / शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (Acid Attack Victims) / स्नायु विकृती (Muscular Dystrophy)												
अनाथ	**एकूण ०१ पद — संस्थात्मक**												

१.२ महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एकूण ०१ पद)

प्रवर्ग	अ.जा.	अ.ज.	वि.जा. (अ)	भ.ज. (ब)	भ.ज. (क)	भ.ज. (ड)	इ.मा.व.	वि.मा.प्र.	सा. आणि शै. मागास वर्ग.	आ.दु.घ.	एकूण आरक्षित पदे	अराखीव पदे	एकूण पदे
पदसंख्या	--	--	--	१	--	--	--	--	--	--	१	--	१
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
सर्वसाधारण	--	--	--	१	--	--	--	--	--	--	१	--	१
महिला	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--
खेळाडू	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--
दिव्यांग	--												
अनाथ	--												

२. राज्य कर निरीक्षक, गट-ब, (अराजपत्रित) (एकूण २०९ पदे)

प्रवर्ग	अ.जा.	अ.ज.	वि.जा. (अ)	भ.ज. (ब)	भ.ज. (क)	भ.ज. (ड)	इ.मा.व.	वि.मा.प्र.	सा. आणि शै. मागास वर्ग.	आ.दु.घ.	एकूण आरक्षित पदे	अराखीव पदे	एकूण पदे
पदसंख्या	२०	--	६	४	२	४	३७	१	२१	२१	११६	९३	२०९
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
सर्वसाधारण	१३	--	४	३	१	३	२४	१	१४	१४	७७	६०	१३७
महिला	६	--	२	१	१	१	११	--	६	६	३४	२८	६२
खेळाडू	१	--	--	--	--	--	२	--	१	१	५	५	१०
दिव्यांग	**एकूण - ०८ पदे** [**०३ पदे-** अंध / अल्पदृष्टी (Blind / Low Vision), **०२ पदे** - कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता (Deaf / Hard Hearing), **०१ पदे** - अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (Leprosy Cured) / शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (Acid Attack Victims) / स्नायु विकृती (Muscular Dystrophy, **०२ पदे** - स्वमग्नता (Autism) / मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (Specific Learning Disability) / मानसिक आजार (Mental Illness) तसेच बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व]												
अनाथ	**एकूण ०२ पदे** [०१ पद - **संस्थात्मक**, ०१ पद **- संस्थाबाह्य**]												

३. पोलीस उपनिरीक्षक, गट-ब (अराजपत्रित) (एकूण २१६ पदे)

प्रवर्ग	अ.जा.	अ.ज.	वि.जा. (अ)	भ.ज. (ब)	भ.ज. (क)	भ.ज. (ड)	इ.मा.व.	वि.मा.प्र.	सा. आणि शै. मागास वर्ग.	आ.दु.घ.	एकूण आरक्षित पदे	अराखीव पदे	एकूण पदे
पदसंख्या	२१	१८	१५	५	१२	६	५५	८	२२	२२	१८४	३२	२१६
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
सर्वसाधारण	१४	१२	१०	३	७	४	३६	६	१४	१४	१२०	२०	१४०
महिला	६	५	४	२	४	२	१६	२	७	७	५५	१०	६५
खेळाडू	१	१	१	--	१	--	३	--	१	१	९	२	११
दिव्यांग	--												
अनाथ	**एकूण ०२ पदे - १-संस्थात्मक व १-संस्थाबाह्य**												

३. संयुक्त पूर्व परीक्षेच्या निकालाधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांकरीता मुख्य परीक्षेचा दिनांक स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येइल.

३.१ प्रस्तुत जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीची पुर्तता करणा-या उमेदवारांकडून आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत.

३.२ अर्ज सादर करण्याची प्रक्रिया/कालावधी :-

अ.क्र.	तपशील	विहित कालावधी
१	अर्ज सादर करण्याचा कालावधी	**दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ रोजी १४.०० पासून** **दिनांक ०४ नोव्हेंबर , २०२४ रोजी २३:५९ वाजेपर्यंत**
२	ऑनलाईन पद्धतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक	**दिनांक ०४ नोव्हेंबर , २०२४, २०२४ रोजी २३:५९ वाजेपर्यंत**
३	भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक	**दिनांक ०६ नोव्हेंबर , २०२४ रोजी २३:५९ वाजेपर्यंत**
४	चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक	**दिनांक ०७ नोव्हेंबर , २०२४ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये**

४. पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी :-

४.१ पदसंख्या व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागांच्या सूचनेनुसार बदल/वाढ होण्याची शक्यता आहे.

४.२ पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल झाल्यास त्याचा समावेश मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेमध्ये करण्यात येईल. तसेच याबाबतची घोषणा/सूचना वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या घोषणा/सूचनांच्या आधारे प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या पदाकरीता भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

४.३ केवळ प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद विविध संवर्गाच्या संदर्भात पूर्व परीक्षेचा निकाल अंतिम करेपर्यंतच्या कालावधीपर्यंत शासनाकडून सुधारित/अतिरिक्त मागणीपत्राद्वारे प्राप्त होणारी सर्व पदे पूर्व परीक्षेच्या निकालासाठी विचारात घेण्यात येतील.

४.४ प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद संवर्गामध्ये काही मागास प्रवर्ग व समांतर आरक्षणाची पदे उपलब्ध नाहीत. तथापि, जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर तसेच पूर्व परीक्षेचा निकाल अंतिम करेपर्यंत नव्याने प्राप्त होणा-या मागणीपत्रांमध्ये जाहिरातीत नमूद नसलेल्या मागास प्रवर्ग तसेच समांतर आरक्षणाकरीता पदे उपलब्ध होण्याची आणि विद्यमान पदसंख्येमध्ये बदल/वाढ होण्याची शक्यता आहे. सदर बदललेली पदसंख्या/अतिरिक्त मागणीद्वारे प्राप्त पदे पूर्व परीक्षेचा निकाल अंतिम करताना विचारात घेतली जाईल. यास्तव पूर्व परीक्षेच्या जाहिरातीमध्ये पद आरक्षित नसल्यामुळे अथवा पदसंख्या कमी असल्यामुळे पूर्व परीक्षेसाठी अर्ज सादर केला नसल्याची व त्यामुळे निवडीची संधी वाया गेल्याबाबतची तक्रार नंतर कोणत्याही टप्प्यावर विचारात घेतली जाणार नाही.

४.५ विविध सामाजिक प्रवर्ग, महिला, प्राविण्यप्राप्त खेळाडू, अनाथ इत्यादींसाठी सामाजिक व समांतर आरक्षण शासनाकडून वेळोवळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार राहील.

४.६ शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक-महिआ२०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२, दिनांक ०४ मे, २०२३ अन्वये विहित कार्यपद्धतीनुसार अराखीव महिलांकरीता आरक्षित पदावरील निवडीसाठी अराखीव महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांकरीत नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्यात आली आहे.

४.७ अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित पदावरील निवडीसाठी दावा करू इच्छिणाऱ्या महिलांना संबंधित मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन-क्रीमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याबाबतच्या तरतुदी लागू राहतील.

४.८ महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणा-या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून इतर सर्व मागास प्रवर्गातील महिलांसाठी नॉन-क्रिमिलेअरमध्ये मोडत असल्याबाबतचा स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

४.९ विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

४.१० अर्ज करताना एखादी जात/जमात राज्य शासनाकडून आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषित केली असल्यासच तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र उमेदवाराकडे उपलब्ध असेल तर संबंधित जात/जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

४.११ समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर, २०१८ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

४.१२ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ व दिनांक ३१ मे, २०२१ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल. तसेच सदर संवर्गातील उमेदवारांकरीता शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

४.१३ सदर जाहिरात सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग अधिनियम दिनांक २६ फेब्रुवारी २०२४ व संबंधित शासन निर्णय दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ संदर्भात मा. उच्च न्यायालयात दाखल झालेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून प्रसिद्ध करण्यात येत आहे. या जाहिराती संबंधित शिफारशी व नियुक्त्या उक्त उल्लेखिल न्यायिक प्रकरणाच्या अधीन राहून करण्यात येतील. त्या अनुषंगाने आयोगामार्फत दिनांक २६ एप्रिल, २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेले प्रसिद्धीपत्रक जाहीरातीस लागू राहतील.

४.१४ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: बीसीसी/प्र.क्र.७५/१६-क, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ अन्वये सामाजिक व शैक्षणिक मागासवर्गाकरीता आरक्षण विहित करण्यात आले असून शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग , क्रमांक बीसीसी-२०२४/प्र.क्र.७५/आरक्षण-५, दिनांक २८ जून, २०२४ अन्वये विहित करण्यात आलेले जात प्रमाणपत्र आणि नॉन क्रिमिलेअर प्रकारपत्र सादर करणे आवश्यक राहील.

४.१५ शासन शुद्धिपत्रक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्रमांक : संकीर्ण-२०२३/प्र.क्र.७६/मावक, दिनांक ०९ मार्च, २०२३ अन्वये शासनाकडून जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, संबंधित उमेदवार उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गटात मोडत नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी सन **२०२४-२०२५** या आर्थिक वर्षाचे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

४.१६ सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल. याबाबतचा तपशील वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

४.१७ अराखीव (खुला)सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता गुणवत्तेच्या आधारे सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

४.१८ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणाऱ्या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधत्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

४.१९ सामाजिक अथवा समांतर आरक्षणाचा अथवा सोयी सवलतींचा दावा करणा-या उमेदवाराकडे संबंधित कायदा / नियम / आदेशानुसार विहित नमुन्यातील पूर्व परीक्षेच्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या दिनांकापूर्वीचे वैध प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे. वैध प्रमाणपत्रांचा कालावधी संबंधित शासन आदेशावरील तरतुदीनुसार (लागू असेल त्याप्रमाणे) ग्राह्य समजण्यात येईल.

४.२० सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

४.२१ खेळाडू आरक्षण :-

४.२१.१ शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६, तसेच शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक:राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : संकीर्ण-१७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२, दिनांक ३० जून, २०२२ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

४.२१.२ प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तींसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले पात्र खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र पूर्व परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे असणे बंधनकारक आहे.

४.२१.३ विहित दिनांकास खेळाचे प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्यासबाबत तसेच उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे अन्यथा प्राविण्यप्राप्त खेळाडू आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पुर्वीचे सक्षम क्रीडा प्राधिकरणाने निर्गमित केलेले क्रीडा प्रमाणपत्र नसल्यास अथवा सदर प्राधिकरणाकडे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीसाठी केलेल्या अर्जाची पोचपावती सादर केली नसल्यास, संबंधित उमेदवाराचा खेळाडूकरीता आरक्षित पदावर विचार करण्यात येणार नाही.

४.२१.४ एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणा-या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधित उपसंचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

४.२१.५ मुख्य परीक्षेकरीता अर्ज सादर करतांना खेळाडू उमेदवारांनी विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र तसेच त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत तसेच खेळाडू कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीचा सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल सादर केला तरच उमेदवारांचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर शिफारशी/नियुक्तीकरीता विचार करण्यात येईल.

४.२२ दिव्यांग आरक्षण :-

४.२२.१ दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ, दिनांक २९ मे, २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

४.२२.२ प्रस्तुत परीक्षेमधून भरण्यात येणा-या विविध संवर्ग/पदांकरीता दिव्यांग सुनिश्चिती संदर्भातील तपशील खालीलप्रमाणे आहे :-

अ.क्र.	पदाचे नांव	शासन आदेश	पात्र दिव्यांगत्वाचा प्रकार
१	सहायक कक्ष अधिकारी	शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. कअस-१३१९/प्र.क्र.७४/१४-ब, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२१	(1) B, LV (2) D, HH, (3) OA, BA, OL, BL, OAL, CP, LC, DW, AAV, (4) SLD, MI (5) MD involving (1) to (4) above
२	राज्य कर निरीक्षक	शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: विकवि-१०२१/ प्र.क्र.१३/वि.प्र.-४, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२१	(1) B, LV (2) D, HH, (3) OA, BA, OL, BL, OAL, CP, LC, DW, AAV, (4) SLD, MI (5) MD involving (1) to (4) above
३	पोलीस उपनिरीक्षक	शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक पोलीस-१८२१/ प्र.क्र.५२/पोल-५अ, दिनांक ०४ ऑगस्ट, २०२१	दिव्यांग उमेदवार पात्र नाही.

४.२२.३ दिव्यांग व्यक्तींसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

४.२२.४ दिव्यांग व्यक्तींची संबंधित संवर्ग/पदाकरीता पात्रता शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

४.२२.५ दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित पदांवर शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्यांची शिफारस करण्यात येईल.

४.२२.६ संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकारचे किमान ४०% दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र धारक उमेदवार / व्यक्ती आरक्षण तसेच नियमानुसार अनुज्ञेय सोयी / सवलतीसाठी पात्र असतील.

४.२२.७ लक्षणीय दिव्यांगत्व असलेले उमेदवार / व्यक्ती खालील सवलतींच्या दाव्यास पात्र असतील:-

(१) दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद लक्षणीय दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित असल्यास नियमानुसार अनुज्ञेय आरक्षण व इतर सोयी सवलती.

(२) दिव्यांगत्याचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद संबंधित दिव्यांग प्रकारासाठी सुनिश्चित केले असल्यास नियमानुसार अनुज्ञेय सोयी सवलती.

४.२२.८ लक्षणीय दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय प्रणालीदवारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

४.२२.९ शासन परिपत्रक, दिव्यांग कल्याण विभाग, क्रमांक: दिव्यांग-२०२४/प्र.क्र.८६/दि.क.२, दिनांक २७ जून, २०२४ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये / भविष्यात वेळोवेळी स्थापन करण्यात आलेल्या / येणाऱ्या वैद्यकीय मंडळामार्फत दिव्यांगत्व प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र (UDID Card) प्राप्त करुन घेणे अनिवार्य आहे. वैश्विक ओळखपत्र (UDID Card) प्राप्त करुन घेण्यासाठी नोंदणी केल्यानंतर प्रत्यक्षात सदर ओळखपत्र प्राप्त होईपर्यन्तच्या कालावधीसाठी दिव्यांग व्यक्तींना दिव्यांगत्वाच्या सवलती / योजनांचा लाभ घेण्यासाठी त्यांचेकडे असलेले दिव्यांगत्व प्रमाणपत्रासोबत वैश्विक ओळखपत्रासाठीचा नाव नोंदणी क्रमांक (Enrollment Number) सादर करणे अनिवार्य राहील. दिव्यांग उमेदवारांनी अर्ज करताना शासन परिपत्रक, दिव्यांग कल्याण विभाग, क्रमांक: दिव्यांग-२०२४/प्र.क्र.८६/ दि.क.२, दिनांक २७ जून, २०२४ मधील सर्व तरतुदींचे अवलोकन करण्यात यावे. त्यातील तरतुदींनुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

४.२२.१० लक्षणीय दिव्यांगत्व असणा-या उमेदवारांना अर्जामध्ये नमूद केलेला दिव्यांगत्वाचा प्रकार / उप प्रकार बदलणे अनुज्ञेय नाही.

४.२३ दिव्यांग उमेदवार :- लेखनिक आणि / अथवा अनुग्रह कालावधीबाबत

४.२३.१ लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांना परीक्षेच्यावेळी लेखनिक आणि/अथवा इतर सोयी सवलती उपलब्ध करून देण्यासंदर्भात शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक : दिव्यांग२०१९/प्र.क्र.२००//दि.क.२, दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२१ अन्वये जारी करण्यात आलेल्या - "**लक्षणीय (Benchmark) दिव्यांग व्यक्तींच्याबाबत लेखी परीक्षा घेण्याबाबतची मार्गदर्शिका-२०२१**" तसेच तदनंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

४.२३.२ प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या, पात्र दिव्यांग उमेदवारांना, लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असल्यास संबंधित उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने आयोगास अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून सात (७) दिवसाच्या आत आवश्यक प्रमाणपत्र/कागदपत्रांसह विहित नमुन्यामध्ये आयोगाकडे लेखी विनंती करुन पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

४.२३.३ लेखनिकाची व्यवस्था उमेदवारांकडून स्वत: केली जाणार आहे की आयोगाच्या कार्यालयामार्फत लेखनिकाची व्यवस्था करावी लागणार आहे, याचा स्पष्ट उल्लेख जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जामध्ये असल्यासच विहित नमुन्याद्वारे प्राप्त लेखी विनंतीचा विचार केला जाईल.

४.२३.४ अर्जामध्ये मागणी केली नसल्यास तसेच आयोगाची विहित पध्दतीने पूर्व परवानगी घेतली नसल्यास ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही अथवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय असणार नाही.

४.२३.५ परीक्षेकरीता लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीची परवानगी दिलेल्या पात्र उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीच्या परवानगीबाबत संबंधित उमेदवाराला आयोगाकडील नोंदणीकृत ई-मेलवर कळविण्यात येईल.

४.२३.६ प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी लेखनिक व अनुग्रह कालावधीचा लाभ घेण्यास इच्छुक असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी आयोगामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्यापूर्वी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या " **दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचना** " चे अवलोकन करणे उमेदवारांचे हिताचे राहील.

४.२४ अनाथ आरक्षण :-

४.२४.१ अनाथ व्यक्तींचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक: अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३, दिनांक ०६ एप्रिल, २०२३, दिनांक १० मे, २०२३ अनुसार तसेच शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार राहील.

४.२४.२ अनाथ आरक्षण धोरण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, पूरक पत्र, क्रमांक: अनाथ-२०२२/ प्र.क्र.१२२/का-०३, दिनांक १० मे, २०२३ अन्वये एखाद्या भरती प्रक्रियेमध्ये अनाथ आरक्षणाच्या एका प्रवर्गासाठी उपलब्ध जागांवर गुणवत्तेनुसार त्या प्रवर्गातील अनाथ उमेदवार पर्याप्त प्रमाणात उपलब्ध होऊ शकले नाहीत, तर त्या भरती प्रक्रियेमध्ये ती पदे अनाथांच्या दुसऱ्या प्रवर्गातील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

४.२४.३ अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे; त्या प्रवर्गातून करण्यात येईल.

४.२४.४ पूर्व परीक्षेच्या अर्जाद्वारे अनाथ आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी दिनांक ०६ सप्टेंबर, २०२२, दिनांक ०६ एप्रिल, २०२३ आणि दिनांक १० मे, २०२३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार विहित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र आयोगाकडून निश्चित करण्यात येणाऱ्या विहित कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा अनाथ आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नाही.

५. वेतनश्रेणी :- सर्व संवर्गासाठी S-१४ : रुपये ३८६००-१२२८०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते.

६. पात्रता :-

६.१ भारतीय नागरिकत्व.

६.२ वयोमर्यादा :-

६.२.१ विविध अराजपत्रित प्रवर्ग/ उपप्रवर्गासाठी किमान व कमाल वयोमर्यादा :-

अ. क्र.	संवर्ग	वयोमर्यादा गणण्याचा दिनांक	वय							
			किमान	कमाल		प्राविण्य प्राप्त खेळाडू		माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी		दिव्यांग उमेदवार
			अमागास / मागासवर्गीय / आ. दु. घ.	अमागास	मागासवर्गीय/ अनाथ/ आ. दु. घ.	अमागास	मागासवर्गीय/ आ. दु. घ.	अमागास	मागासवर्गीय/ आ. दु. घ.	
१	सहायक कक्ष अधिकारी	०१ फेब्रुवारी, २०२५	१८	३८	४३	४३	४३	४३	४३	वयाच्या ४५ वर्षापर्यंत
२	राज्य कर निरीक्षक		१८	३८	४३	४३	४३	४३	४३	वयाच्या ४५ वर्षापर्यंत
३	पोलीस उप निरीक्षक		१९	३१	३४	३६	३६	३६	३६	अपात्र

६.२.२ विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

६.३ अर्हता :-

६.३.१. शैक्षणिक अर्हता :-

(एक) सांविधिक विद्यापीठाची पदवी किंवा तिच्याशी समतुल्य असणारी शासनाने घोषित केलेली इतर कोणतीही तत्सम अर्हता.

(दोन) पदवी परीक्षेस बसलेले उमेदवार प्रस्तुत संयुक्त पूर्व परीक्षेस तात्पुरते पात्र असतील. परंतु संयुक्त पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे संबंधित संवर्गाकरीता घेण्यात येणा-या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरणा-या उमेदवारांनी संबंधित संवर्गाच्या मुख्य परीक्षेकरीता अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

(तीन) अंतर्वासिता (Internship) किंवा कार्यशाळेतील कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवीधारकाने ही अट मुख्य परीक्षेचे अर्ज स्वीकारण्याच्या विहित अंतिम दिनांकापर्यंत पूर्ण केली असली पाहिजे.

(चार) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

६.३.२. शारीरिक पात्रता :-

(एक) पोलीस उपनिरीक्षक संवर्गाकरीता उमेदवारांकडे उपरोक्त अर्हतेसोबत खालीलप्रमाणे किमान शारीरिक पात्रता असणे आवश्यक आहे :-

अ.क्र.	संवर्ग	पुरुषांसाठी / स्वत:ची लिंग ओळख पुरुष अशी केलेल्या तृतीयपंथी उमेदवारांकरीता	महिलांसाठी / स्वत:ची लिंग ओळख महिला/तृतीयपंथी अशी केलेल्या तृतीयपंथी उमेदवारांकरीता
१	पोलीस उपनिरीक्षक	(१) उंची - १६५ सें. मी. (अनवाणी) (कमीत कमी) (२) छाती - न फुगविता ७९ से.मी. फुगविण्याची क्षमता किमान ५ से.मी. आवश्यक	उंची - १५७ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी)

(दोन) संबंधित संवर्गातील नियुक्तीकरीता शिफारस पात्र उमेदवारांची शारीरिक मोजमापे नियुक्ती करण्यापूर्वी शासनामार्फत सक्षम प्राधिका-याकडून तपासून घेण्यात येतील. विहित शारीरिक पात्रता नसल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी अपात्र ठरेल.

६.३.४ अर्हता/पात्रता गणण्याचा दिनांक :-

मुख्य परीक्षेकरीता अर्ज स्वीकारण्यासाठी विहित अंतिम दिनांकापर्यंत किंवा त्यापूर्वी विहित शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे अनिवार्य आहे.

७. निवडप्रकिया :-

७.१ जाहिरातीमध्ये नमूद अर्हता/पात्रतेविषयक अटी किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार शिफारशीसाठी पात्र असणार नाही.

७.२ सेवा भरतीची संपूर्ण प्रक्रिया खालील सेवा प्रवेश नियम अथवा तदनंतर शासनाकडून वेळोवेळी करण्यात येणा-या सुधारणा तसेच आयोगाकडून वेळोवेळी सुधारण्यात येणाऱ्या कार्यनियमावलीतील तरतुदींनुसार राबविण्यात येईल :-

(१) सहायक कक्ष अधिकारी, गट-ब (अराजपत्रित) सेवाप्रवेश नियम २०१८.

(२) राज्य कर निरीक्षक, (विक्रीकर निरीक्षक) गट-ब (अराजपत्रित) सेवाप्रवेश नियम २०२१.

(३) पोलीस उप निरीक्षक, गट-ब (अराजपत्रित) सेवाप्रवेश नियम १९९५.

८. परीक्षेचे टप्पे —

८.१ विविध संवर्गाकरीता भरती प्रक्रिया खालीलप्रमाणे त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या टप्प्यामध्ये राबविण्यात येईल :-

अ.क्र.	संवर्ग	टप्पे	संयुक्त पूर्व परीक्षेचे गुण	मुख्य परीक्षेचे गुण
१	सहायक कक्ष अधिकारी	संयुक्त पूर्व परीक्षा व मुख्य परीक्षा	१००	४०० गुण [महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा मुख्य परीक्षा]
२	राज्य कर निरीक्षक			
४	पोलीस उप निरीक्षक			

८.२ पोलीस उपनिरीक्षक संवर्गातील पदभरतीसाठी शारीरिक चाचणी १०० गुणांची असेल.

८.३ शारीरिक चाचणीचे गुण अर्हताकारी (Qualifying) स्वरुपाचे असून एकूण गुणांपैकी किमान ६० टक्के गुण (म्हणजेच ६० गुण) मुलाखतीस पात्र होण्यासाठी आवश्यक राहतील. तसेच या गुणांचा अंतिम गुणवत्तेकरीता/अंतिम निवडीकरीता विचार होणार नाही.

८.४ शारिरीक चाचणीमध्ये किमान ६० टक्के गुण धारण करणा-या उमेदवारांकरीता ४० गुणांची मुलाखत घेण्यात येईल.

८.५ मुख्य परीक्षेतील गुण व मुलाखतीमधील एकत्रित गुणांच्या आधारे पोलीस उपनिरीक्षक संवर्गाकरीता निवडप्रक्रिया राबविण्यात येईल.

८.६ आयोगाच्या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रस्तुत परीक्षेच्या परीक्षा योजना/ पध्दतीनुसार पूर्व परीक्षेचा निकाल व मुख्य परीक्षेची अंतिम निकाल प्रक्रिया राबविण्यात येईल.

८.७ मुख्य परीक्षेस प्रवेश :-

८.७.१ मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाकडून निश्चित केलेल्या गुणांच्या सीमारेषा व मर्यादेनुसार संबंधित संवर्गाच्या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी अर्हताप्राप्त ठरणाऱ्या तसेच जाहिरात/अधिसूचनेतील तरतुदींनुसार आवश्यक शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांस संबंधित मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

८.७.२ मुख्य परीक्षेकरीता आयोगाच्या कार्यालयाकडून अधिसूचना निर्गमित झाल्यानंतर आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळाद्वारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईलद्वारे अर्ज करता येईल. त्यावेळी मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाने विहित केलेल्या पद्धतीने परीक्षा केंद्र निवडून परीक्षा-शुल्क विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

८.७.३ संबंधित संवर्गाच्या संयुक्त मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारास स्वतंत्रपणे अर्ज सादर करुन विहित परीक्षा शुल्क भरावे लागेल.

९. पूर्व परीक्षेकरीता अर्ज करण्याची पध्दत :-

९.१ अर्ज सादर करण्याचे टप्पे :-

(एक) आवश्यक असल्यास खाते अद्ययावत करणे.

(दोन) विहित कालावधीत तसेच विहित पध्दतीने खालीलप्रमाणे लागू असेल त्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रे अपलोड करुन अर्ज सादर करणे .

(तीन) परीक्षा शुल्काचा भरणा विहित पध्दतीने करणे.

(चार) जिल्हा केंद्र निवड करणे.

(पाच) संयुक्त पूर्व परीक्षेच्या जाहिरातीस अनुसरुन, अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी आयोगाच्या संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन पद्धतीने महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षेकरीता अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

(सहा) संयुक्त पूर्व परीक्षेकरीता भरावयाच्या अराखीव व आरक्षित एकूण पदसंख्येच्या आधारे, मुख्य परीक्षेसाठी पात्र करावयाच्या उमेदवारांची संख्या निश्चित करुन, सामाईक पूर्व परीक्षेमधील उमेदवारांच्या गुणांच्या आधारे गट-ब (अराजपत्रित) सेवेकरीता एकत्रित निकाल जाहीर करण्यात येईल.

९.२ विहित कागदपत्रे/प्रमाणपत्रे अपलोड करणे :-

(एक) प्रोफाईलमध्ये केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने पूर्व परीक्षेकरीता अर्ज सादर करताना खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक तसेच अनाथ आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांव्यतिरिक्त अन्य उमेदवारांना कोणतीही कागदपत्रे अपलोड करण्याची आवश्यकता नाही.

(दोन) विविध सामाजिक व समांतर आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांची पात्रता आजमावल्यानंतर (Check eligibility) उमेदवार जाहिरातीनुसार पात्र ठरत असल्यास अर्ज सादर करताना खालील कागदपत्रे/प्रमाणपत्रे (लागू असलेली) अपलोड करणे अनिवार्य आहे :-

अ.क्र.	प्रमाणपत्र/कागदपत्र	फाईल फॉर्मेट	किमान फाईल साईज (KB)	कमाल फाईल साईज (KB)
१	पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा (लागू असेल त्याप्रमाणे)	PDF	५०	५००
२	खेळाडूसाठीच्या आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा (लागू असेल त्याप्रमाणे)	PDF	५०	५००
३	अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा (लागू असेल त्याप्रमाणे)	PDF	५०	५००
४	माजी सैनिक सवलतीसाठी पात्र असल्याचा पुरावा (लागू असेल त्याप्रमाणे)	PDF	५०	५००
५	अराखीव महिला, मागासवर्गीय, आ.दु.घ., खेळाडू, दिव्यांग, माजीसैनिक अथवा अनाथ आरक्षणाचा/सोयीसवलतींचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र	PDF	५०	५००

(तीन) उपरोक्त प्रमाणपत्र/कागदपत्रे आयोगाच्या संकेतस्थळावरील 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' प्रकरण क्रमांक चार तसेच प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे असणे अनिवार्य आहे.

(चार) खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक, अनाथ आरक्षणाच्या दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड केल्याशिवाय अर्ज सादर करता येणार नाही.

९.३ सर्वसाधारण :-

(एक) अर्ज फक्त आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे स्वीकारण्यात येतील.

(दोन) अर्ज सादर करण्याकरीता संकेतस्थळ :- https://mpsconline.gov.in

(तीन) अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mpsconline.gov.in तसेच https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

(चार) आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

९.४ जिल्हा केंद्र निवड :-

९.४.१ प्रस्तुत परीक्षेकरीता विविध जिल्हा केंद्राचा तपशील आयोगाच्या संकेतस्थळावरील सदर परीक्षेच्या "परीक्षा योजना/पद्धती" या सदरामध्ये उपलब्ध आहे.

९.४.२ अर्ज सादर करतानाच जिल्हा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे.

९.४.३ जिल्हा केंद्र बदलाबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत अथवा कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही

९.५ परीक्षा शुल्काचा भरणा:-

९.५.१ परीक्षा शुल्क (फी) :-

अ.क्र	परीक्षेचे नाव	शुल्क रुपये			
		अमागास	मागासवर्गीय/ आ.दु.घ./ अनाथ	माजी सैनिक गट-ब संवर्ग	
				अमागास	मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ
१	संयुक्त पूर्व परीक्षा	३९४	२९४	३९४	२९४
२	मुख्य परीक्षा	५४४	३४४	५४४	३४४

९.५.२ उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.

९.५.३ परीक्षा शुल्क ना-परतावा (Non-refundable) आहे.

९.५.४ अर्ज सादरीकरणाचे टप्पे पूर्ण झाल्यावर उपलब्ध होणाऱ्या 'Submit and Pay fees' या बटनवर क्लिक केल्यानंतर किंवा मुख पृष्ठावरील 'माझे खाते' या सदराखालील अर्ज केलेल्या पदांच्या यादीतील 'Fees not Paid' अशी सद्यस्थिती लिहिलेल्या जाहिरात/पद/परीक्षेसमोरील 'Pay Now' या लिंकवर क्लिक करुन परीक्षा शुल्काचा भरणा करता येईल.

९.५.५ परीक्षा शुल्काचा भरणा खालील दोन पध्दतीने करता येईल:-

(एक) **ऑनलाईन पध्दतीने :-**

(१) भारतीय स्टेट बँक तसेच प्रणालीद्वारे उपलब्ध करुन दिलेल्या कोणत्याही एका पेमेंट गेटवेच्या माध्यमातून क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगद्वारे परीक्षा शुल्क अदा करता येईल.

(२) परीक्षा शुल्काचा भरणा करताना बँक खात्यामधून परीक्षा शुल्काच्या रकमेची वजावट झाल्यावर परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वीपणे झाला (Payment Successful) असल्याचा संदेश आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या पृष्ठावर प्रदर्शित झाल्याशिवाय व परीक्षा शुल्काची पावती तयार झाल्याशिवाय संकेतस्थळावरील संबंधित पृष्ठावरून आणि/अथवा खात्यातून लॉगआऊट होऊ नये.

(३) परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी झाला आहे किंवा कसे, याची स्थिती (status)लगेचच अवगत होईल. खात्यातून Logout होण्यापूर्वी परीक्षा शुल्क यशस्वीपणे भरले असल्याबाबत व बँकेकडून व्यवहार (Transaction) पूर्ण झाला असल्याबाबत खात्री करण्याची जबाबदारी उमेदवाराची आहे.

(४) कोणत्याही कारणामुळे विहित कालावधीत ऑनलाईन पद्धतीने परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वीपणे करणे शक्य न झाल्यास अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकानंतर दोन दिवसापर्यंत परीक्षाशुल्काचा भरणा ऑफलाईन पद्धतीने करण्याकरीता चलनाची प्रत घेता येईल.

(**दोन**) **ऑफलाईन पध्दतीने** :- चलनाद्वारे

चलनाद्वारे परीक्षा शुल्काचा भरणा करण्याचा विकल्प निवडल्यास उपलब्ध होणारी चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत बँकेच्या कार्यालयीन वेळेत विहित अंतिम दिनांकापूर्वी परीक्षा शुल्काचा भरणा करता येईल. तथापि, चलनाची प्रत घेणे व बँकेत शुल्क जमा करणे, यामध्ये किमान तीन तासांचे कालावधी राहील, याची दक्षता घ्यावी.

९.५.६ परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी न झाल्यास पुन्हा शुल्क भरण्याची अथवा चलन घेण्याबाबतची कार्यवाही प्रस्तुत जाहिरातीच्या/अधिसूचनेच्या अनुषंगाने विहित दिनांकापूर्वीच करणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणास्तव व्यवहार अयशस्वी ठरल्यास यासंदर्भातील तक्रारीची आयोगाकडून दखल घेतली जाणार नाही.

९.५.७ विहित मुदतीत परीक्षा शुल्काचा भरणा करु न शकलेल्या उमेदवारांचा संबंधित भरतीप्रक्रियेकरीता विचार केला जाणार नाही. यासंदर्भात आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचनांमधील संबंधित तरतुदींचे अवलोकन करणे उमेदवारांच्या हिताचे राहील.

१०. सेवाप्रवेशोत्तर शर्ती :-

१०.१ नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील अर्हता/परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील :-

१०.१.१ जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा.

१०.१.२ हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा.

१०.१.३ महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणीबाबतची प्रमाणपत्र परीक्षा.

११. प्रवेशप्रमाणपत्र :-

११.१ परीक्षेस प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेशप्रमाणपत्रे आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळावर (https://mpsconline.gov.in) उमेदवारांच्या प्रोफाईलद्वारे परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे ७ दिवस अगोदर उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

११.२ परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वत:चे प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

११.३ प्रवेश प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात आल्यानंतर उमेदवाराला त्याच्या आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे कळविण्यात येईल. याबाबतची घोषणा आयोगाच्या संकेतस्थळावर परीक्षेपूर्वी एक सप्ताह अगोदर प्रसिद्ध करण्यात येईल.

११.४ परीक्षेच्या दिनांकापूर्वी ३ दिवस अगोदर प्रवेश प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास अर्ज सादर केल्याच्या आवश्यक पुराव्यासह आयोगाच्या कार्यालयाकडे संपर्क साधावा.

११.५ परीक्षेच्यावेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसेन्स यापैकी किमान कोणतेही **एक मूळ ओळखपत्र** तसेच मूळ ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

११.६ आधार कार्डच्या ऐवजी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड केलेले ई-आधार सादर करणा-या उमेदवारांच्या बाबतीत ई-आधार वर उमेदवाराचे नाव, पत्ता, लिंग, फोटो, जन्मदिनांक या तपशीलासह आधार निर्मितीचा दिनांक (Date of Aadhaar generation) व आधार डाऊनलोड केल्याचा दिनांक असल्यासच तसेच सुस्पष्ट फोटोसह **रंगीत प्रिंट** मध्ये आधार डाऊनलोड केले असल्यासच ई-आधार वैध मानण्यात येईल.

११.७ नावांमध्ये बदल केलेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहित स्त्रियांच्या बाबतीत), नावांत बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावांत बदल झाल्यासंबंधीचा दाखला व त्याची छायांकित प्रत परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

१२. परीक्षेस प्रवेश :-

संबंधित परीक्षेच्या प्रवेशप्रमाणपत्रावर नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून उमेदवारांना परीक्षेच्या उपस्थितीसाठी पात्र समजण्यात येईल.

१३. प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील **"उमेदवारांकरीता माहिती"** विभागातील **"सूचना"** अंतर्गत **"सर्वसाधारण सूचना"** तसेच **"परीक्षा"** या सदराखालील **"परीक्षा योजना"** विभागातील **"महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त परीक्षा"** मध्ये तसेच पूर्व परीक्षा व मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रम **"उमेदवारांकरीता माहिती"** विभागातील **"परीक्षा"** अंतर्गत **"अभ्यासक्रम "** येथे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे.

१४. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती/जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

१५. प्रस्तुत परीक्षेच्या आयोजनाच्या दिनांकास अन्य संस्थेची परीक्षा असल्यास उमेदवारास कोणती परीक्षा द्यावयाची आहे; याबाबतचा निर्णय उमेदवाराने स्वत: घेणे आवश्यक राहील.

१६. सदर जाहिरात आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ठिकाण : मुंबई.
दिनांक : ०९ **ऑक्टोबर, २०२४**

उप सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे. (२) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.

महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र लोकसेवा आयोग

त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सेक्टर ११, सरोवर विहार समोर, बेलापूर सीबीडी, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००

Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : सीएमए-४०२३/सीआर-१६०/२०२३/जाहिरात **दिनांक :- १६ ऑक्टोबर, २०२४**

-: शुद्धिपत्रक :-

संदर्भ :- (१)महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा – २०२४, (जा.क्र. ०४८/२०२४) दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२४
(२) महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा – २०२४, (जा.क्र. ०४९/२०२४) दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२४
(३) नगर रचनाकार, गट-अ, (जा.क्र.५०/२०२४), दिनांक १० ऑक्टोबर, २०२४
(४) सहायक नगर रचनाकार, गट-ब, (जा.क्र.०५१/२०२४) , दिनांक १० ऑक्टोबर, २०२४

आयोगामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या उपरोक्त जाहिरातीमधील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता जात प्रमाणपत्र आणि नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्यासंदर्भात संदर्भिय अनुक्रमांक १ व २ येथील जाहिरातीमधील परिच्छेद ४.१४ व अनुक्रमांक ३ व ४ येथील जाहिरातीमधील परिच्छेद ६.१३ खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.

“ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: बीसीसी/प्र.क्र.७५/१६-क, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ अन्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण विहित करण्यात आले असून शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग , क्रमांक बीसीसी-२०२४/प्र.क्र.७५/ आरक्षण-५, दिनांक २८ जून, २०२४ व **दिनांक ०५ जुलै, २०२४** मध्ये दिलेल्या सूचनेनुसार जात प्रमाणपत्र आणि नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. ”

२. दिनांक ०९ व १० ऑक्टोबर , २०२४ रोजी प्रसिद्ध उपरोक्त जाहिरातीमधील इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही.

उपसचिव,(जाहिरात)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक:सीएमए-०४२३/प्र.क्र.१६०/२०२४/जाहिरात **दिनांक : २३ डिसेंबर, २०२४**

-: शुध्दीपत्रक :-

विषय : वयाधिक उमेदवारांना अर्ज सादर करण्यास संधी देणेबाबत

संदर्भ : (१) महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ (जा.क्र.०४८/२०२४) व महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ (जाहिरात क्रमांक ०४९/२०२४)
(२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-२०२४/प्र.क्र.३९/ का.१२(सेवा), दिनाक २० डिसेंबर, २०२४.

महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाकरीता आरक्षण अधिनियम, २०२४, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ अन्वये राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाकरीता राज्य शासकीय सेवेतील पदांवर नियुक्तीसाठी आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. सदर अधिसूचनेतील तरतुदीच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने शासनामार्फत, पदसंख्या व आरक्षण नमूद करुन सुधारित मागणीपत्र प्राप्त झाल्यानुसार आयोगाकडून संदर्भाधीन जाहिराती प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. आयोगाकडून जाहिराती प्रसिध्द झाल्यानंतर संदर्भिय दिनांक २० डिसेंबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे शासन सेवेतील प्रवेशासाठी विहित कमाल वयोमर्यादेत एक वर्ष इतकी शिथिलता देण्याबाबत एक वेळची विशेष बाब म्हणून शासनाकडून निर्णय घेण्यात आला आहे.

२. प्रस्तुत शासन निर्णयाच्या अनुषंगाने आयोगाकडून प्रसिध्द करण्यात आलेल्या खालील संवर्गांच्या जाहिरातींस अनुसरुन विहित कमाल वयोमर्यादेमध्ये एक वर्षांची शिथिलता देण्यात येत असून पात्र उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे:-

अ.क्र.	जाहिरात क्रमांक	परीक्षा / जाहिरात
१	०४८/२०२४	महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४
२	०४९/२०२४	महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४

३. उपरोक्त जाहिरातीस अनुसरून विहित पध्दतीने अर्ज सादर करण्यास खालील प्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे:-

(१) अर्ज सादर करण्याचा **दिनांक २६ डिसेंबर, २०२४ दुपारी १४.०० ते दिनांक ०६ जानेवारी, २०२५ रोजी २३.५९ वाजेपर्यन्त**

(२) ऑनलाईन परिक्षा शुल्क भरण्यासाठी विहित अंतिम **दिनांक ०६ जानेवारी, २०२५ रोजी २३.५९ वाजेपर्यप्त**

(३) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा अंतिम **दिनांक ०८ जानेवारी, २०२५**

(४) चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम **दिनांक ०९ जानेवारी, २०२५** रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेत.

(५) प्रस्तुत शुध्दीपत्रकास अनुसरुन महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ तसेच महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ करीता नव्याने अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांना फक्त अमरावती, छत्रपती संभाजी नगर, नागपूर, नाशिक, नवी मुंबई व पुणे या जिल्हा केंद्रांवरील परीक्षा उपकेंद्रांवर प्रवेश देण्यात येईल.

४. उपरोक्त दोन्ही मूळ जाहिरातीनुसार वयोमर्यादा गणण्याच्या विहित दिनांकास केवळ वयाधिक ठरणाऱ्या पात्र उमेदवारांना अर्ज करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच पात्र उमेदवारांना अर्ज सादर करण्यासाठी उपलब्ध करुन द्यावा लागणारा कालावधी, नजीकच्या काळामध्ये परीक्षा आयोजित करणाऱ्या विविध संस्थांकडून आयोजित इतर परीक्षांचा कार्यक्रम, इत्यादी बाबी लक्षात घेऊन दोन्ही पूर्व परीक्षांचा सुधारित दिनांक खालीलप्रमाणे राहील:-

अ.क्र.	जाहिरात क्रमांक	परीक्षा / जाहिरात	परीक्षांचा सुधारित दिनांक
१	०४८/२०२४	महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४	दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२५
२	०४९/२०२४	महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४	दिनांक ०४ मे, २०२५

५. संबंधित मूळ जाहिरातींमधील इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही.

उप सचिव (जाहिरात),
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई

महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सेक्टर ११, सरोवर विहार समोर, बेलापूर सीबीडी, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक: एनओटी-३६१७/प्र.क्र.५३६/२०२४/जाहिरात **जाहिरात क्रमांक : १०६/२०२५**

महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त मुख्य परीक्षा – २०२४

राज्य शासनाच्या सेवेतील विविध गट-ब (अराजपत्रित) संवर्गासाठी आयोगामार्फत **महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा – २०२४** करीता जाहिरात क्रमांक ०४८/२०२४ दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२४ रोजी प्रसिदृध करण्यात आली असून पूर्व परीक्षा दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२५ रोजी घेण्यात आली होती. सदर संयुक्त पूर्व परीक्षेचा निकाल **दिनांक १९ मे, २०२५** रोजी जाहीर करण्यात आला असून निकालाआधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांकरीता मुख्य परीक्षा **रविवार, दिनांक २९ जून, २०२५ रोजी** अमरावती, छत्रपती संभाजी नगर, नागपूर, नाशिक, नवी मुंबई व पुणे जिल्हा केंद्रांवर आयोजित करण्यात येईल.

२. अर्ज सादर करण्याची प्रक्रिया/कालावधी :-

प्रस्तुत जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या उमेदवारांकडून आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत.

अ.क्र.	तपशील	विहित कालावधी
१	अर्ज सादर करण्याचा कालावधी	**दिनांक २० मे, २०२५ रोजी १४.०० पासून** **दिनांक ०३ जून, २०२५ रोजी २३:५९ वाजेपर्यंत**
२	ऑनलाईन पद्धतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक	**दिनांक ०३ जून, २०२५ रोजी २३:५९ वाजेपर्यंत**
३	भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक	**दिनांक ०५ जून, २०२५ रोजी २३:५९ वाजेपर्यंत**
४	चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक	**दिनांक ०६ जून, २०२५ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये**

३. प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या विविध संवर्गातील पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

१. सहायक कक्ष अधिकारी, गट-ब (अराजपत्रित) :-

१.१ विविध मंत्रालयीन प्रशासकीय विभाग (एकूण ५४ पदे)

प्रवर्ग	अ.जा.	अ.ज.	वि.जा. (अ)	भ.ज. (ब)	भ.ज. (क)	भ.ज. (ड)	इ.मा.व.	वि.मा.प्र.	सा. आणि शै. मागास वर्ग.	आ.दु.घ.	एकूण आरक्षित पदे	अराखीव पदे	एकूण पदे
पदसंख्या	६	३	--	१	१	३	८	--	५	५	३२	२२	५४
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
सर्वसाधारण	३	२	--	१	१	२	५	--	४	३	२१	१४	३५
महिला	२	१	--	--	--	१	२	--	१	२	९	७	१६
खेळाडू	१	--	--	--	--	--	१	--	--	--	२	१	३
दिव्यांग	**एकूण ०२ पदे -** अस्थिव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (Leprosy Cured) / शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (Acid Attack Victims) / स्नायु विकृती (Muscular Dystrophy)												
अनाथ	**एकूण ०१ पद – संस्थात्मक**												

१.२ महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एकूण ०१ पद)

प्रवर्ग	अ.जा.	अ.ज.	वि.जा. (अ)	भ.ज. (ब)	भ.ज. (क)	भ.ज. (ड)	इ.मा.व.	वि.मा.प्र.	सा. आणि शै. मागास वर्ग.	आ.दु.घ.	एकूण आरक्षित पदे	अराखीव पदे	एकूण पदे
पदसंख्या	--	--	--	१	--	--	--	--	--	--	१	--	१
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
सर्वसाधारण	--	--	--	१	--	--	--	--	--	--	१	--	१
महिला	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--
खेळाडू	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--
दिव्यांग	--												
अनाथ	--												

२. राज्य कर निरीक्षक, गट-ब, (अराजपत्रित) (एकूण २०९ पदे)

प्रवर्ग	अ.जा.	अ.ज.	वि.जा. (अ)	भ.ज. (ब)	भ.ज. (क)	भ.ज. (ड)	इ.मा.व.	वि.मा.प्र.	सा. आणि शै. मागास वर्ग.	आ.दु.घ.	एकूण आरक्षित पदे	अराखीव पदे	एकूण पदे
पदसंख्या	२०	--	६	४	२	४	३७	१	२१	२१	११६	९३	२०९
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
सर्वसाधारण	१३	--	४	३	१	३	२४	१	१४	१४	७७	६०	१३७
महिला	६	--	२	१	१	१	११	--	६	६	३४	२८	६२
खेळाडू	१	--	--	--	--	--	२	--	१	१	५	५	१०
दिव्यांग	**एकूण - ०८ पदे** [**०३ पदे-** अंध / अल्पदृष्टी (Blind / Low Vision), **०२ पदे -** कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता (Deaf / Hard Hearing), **०१ पदे -** अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (Leprosy Cured) / शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (Acid Attack Victims) / स्नायु विकृती (Muscular Dystrophy, **०२ पदे -** स्वमग्नता (Autism) / मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (Specific Learning Disability) / मानसिक आजार (Mental Illness) तसेच बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व]												
अनाथ	**एकूण ०२ पदे** [०१ पद - **संस्थात्मक**, ०१ पद - **संस्थाबाह्य**]												

३. पोलीस उपनिरीक्षक, गट-ब (अराजपत्रित) (एकूण २१६ पदे)

प्रवर्ग	अ.जा.	अ.ज.	वि.जा. (अ)	भ.ज. (ब)	भ.ज. (क)	भ.ज. (ड)	इ.मा.व.	वि.मा.प्र.	सा. आणि शै. मागास वर्ग.	आ.दु.घ.	एकूण आरक्षित पदे	अराखीव पदे	एकूण पदे
पदसंख्या	२१	१८	१५	५	१२	६	५५	८	२२	२२	१८४	३२	२१६
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
सर्वसाधारण	१४	१२	१०	३	७	४	३६	६	१४	१४	१२०	२०	१४०
महिला	६	५	४	२	४	२	१६	२	७	७	५५	१०	६५
खेळाडू	१	१	१	--	१	--	३	--	१	१	९	२	११
दिव्यांग	--												
अनाथ	**एकूण ०२ पदे - १-संस्थात्मक व १-संस्थाबाह्य**												

४. पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी :-

४.१ भरावयाच्या उपरोक्त संवर्ग/पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणाबाबतचा तपशील शासनाच्या मागणीपत्रानुसार आहे. तसेच, वर नमूद केलेल्या पदसंख्या व आरक्षणामध्ये शासनाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

४.२ शासनाकडून प्राप्त पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल झाल्यास याबाबतची घोषणा/सूचना वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या घोषणा/सूचनांच्या आधारे प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या पदाकरीता भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

४.३ विविध सामाजिक प्रवर्ग, महिला, प्राविण्यप्राप्त खेळाडू, अनाथ इत्यादींसाठी सामाजिक व समांतर आरक्षण शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार राहील.

४.४ शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक-महिआ२०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२, दिनांक ०४ मे, २०२३ अन्वये विहित कार्यपद्धतीनुसार अराखीव महिलांकरीता आरक्षित पदावरील निवडीसाठी, अराखीव महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांकरीता नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्यात आली आहे.

४.५ अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित पदावरील निवडीसाठी दावा करू इच्छिणाऱ्या महिलांना संबंधित मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन-क्रीमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याबाबतच्या तरतुदी लागू राहतील.

४.६ महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणा-या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून इतर सर्व मागास प्रवर्गातील महिलांसाठी नॉन-क्रिमिलेअरमध्ये मोडत असल्याबाबतचा स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

४.७ विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

४.८ अर्ज करताना एखादी जात/जमात राज्य शासनाकडून आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषित केली असल्यासच तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र उमेदवाराकडे उपलब्ध असेल तर संबंधित जात/जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

४.९ समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर, २०१८ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

४.१० आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ व दिनांक ३१ मे, २०२१ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल. तसेच सदर संवर्गातील उमेदवारांकरीता शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

४.११ सदर जाहिरात सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग अधिनियम दिनांक २६ फेब्रुवारी २०२४ व संबंधित शासन निर्णय दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ संदर्भात मा. उच्च न्यायालयात दाखल झालेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून प्रसिद्ध करण्यात येत आहे. या जाहिराती संबंधित शिफारशी व नियुक्त्या मा. उच्च न्यायालय, मुंबई येथिल रिट याचिका क्रमांक ३४६८/२०२४ व इतर न्यायिक प्रकरणाच्या अधीन राहून करण्यात येतील. त्या अनुषंगाने आयोगामार्फत दिनांक २६ एप्रिल, २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेले प्रसिद्धीपत्रक जाहीरातीस लागू राहतील.

४.१२ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: बीसीसी/प्र.क्र.७५/१६-क, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ अन्वये सामाजिक व शैक्षणिक मागासवर्गाकरीता आरक्षण विहित करण्यात आले असून शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग , क्रमांक बीसीसी-२०२४/प्र.क्र.७५/आरक्षण-५, दिनांक २८ जून, २०२४ व ०५ जुलै, २०२४ अन्वये विहित करण्यात आलेले जात प्रमाणपत्र आणि नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

४.१३ शासन शुद्धिपत्रक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्रमांक : संकीर्ण-२०२३/प्र.क्र.७६/मावक, दिनांक ०९ मार्च, २०२३ अन्वये शासनाकडून जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, संबंधित उमेदवार उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गटात मोडत नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी सन **२०२३-२०२४** या आर्थिक वर्षाचे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

४.१४ सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल. याबाबतचा तपशील वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

४.१५ अराखीव (खुला)सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता गुणवत्तेच्या आधारे सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

४.१६ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणाऱ्या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधत्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

४.१७ सामाजिक अथवा समांतर आरक्षणाचा अथवा सोयी सवलतींचा दावा करणा-या उमेदवाराकडे संबंधित कायदा / नियम / आदेशानुसार विहित नमुन्यातील पूर्व परीक्षेच्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या दिनांकापूर्वीचे वैध प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे. वैध प्रमाणपत्रांचा कालावधी संबंधित शासन आदेशावरील तरतुदीनुसार (लागू असेल त्याप्रमाणे) ग्राह्य समजण्यात येईल.

४.१८ सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

४.१९ खेळाडू आरक्षण :-

४.१९.१ शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६, तसेच शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक:राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: संकीर्ण-१७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२, दिनांक ३० जून, २०२२, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: खेआक्ष-२९२३/प्र.क्र.५७/का-१३, दिनांक ०७ जून, २०२३ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

४.१९.२ प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तींसाठी आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत तसेच उमेदवार कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयी संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालक यांनी प्रदान केलेला विहित नमुन्यातील प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल (शासन निर्णय दिनांक ०१ जुलै, २०१६ सोबतचे परिशिष्ट " क ") पूर्व परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचा किंवा तत्पूर्वीचा असणे तसेच सदर पडताळणी अहवाल अर्जासोबत अपलोड करणे अनिवार्य आहे.

४.१९.३ विहित नमुन्यातील प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल उपलब्ध नसलेल्या उमेदवारांच्या बाबतीत खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे पूर्व परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीच सादर करणे तसेच सक्षम प्राधिकरणाकडे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीसाठी केलेल्या अर्जाची पोच पावती अर्जासोबत अपलोड करणे अनिवार्य आहे. अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

४.१९.४ पूर्व परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचा किंवा तत्पूर्वीचा विभागीय क्रीडा उपसंचालक यांचा विहित नमुन्यातील प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणी अहवाल सादर केला नसल्यास अथवा विहित दिनांकापूर्वी सक्षम प्राधिकरणाकडे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीसाठी केलेल्या अर्जाची पोचपावती सादर केली नसल्यास , संबंधित उमेदवाराचा खेळाडू आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नाही .

४.१९.५ पूर्व परीक्षेच्या प्रवेशाकरीता प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीसाठी सादर केलेल्या अर्जाची पोच पावती अपलोड केलेल्या उमेदवाराने मुख्य परीक्षा/कागदपत्रे पडताळणी/मुलाखतीच्यावेळी विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र तसेच प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत आणि खेळाडू कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीचा संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालक यांनी प्रदान केलेले प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल सादर केला तरच उमेदवारांचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर निवडीकरीता विचार करण्यात येईल.

४.१९.६ एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणा-या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधित उपसंचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

४.२० दिव्यांग आरक्षण :-

४.२०.१ दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ, दिनांक २९ मे, २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

४.२०.२ प्रस्तुत परीक्षेमधून भरण्यात येणा-या विविध संवर्ग/पदांकरीता दिव्यांग सुनिश्चिती संदर्भातील तपशील खालीलप्रमाणे आहे :-

अ.क्र.	पदाचे नांव	शासन आदेश	पात्र दिव्यांगत्वाचा प्रकार
१	सहायक कक्ष अधिकारी	शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. कअस-१३१९/प्र.क्र.७४/१४-ब, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२१	(१) B, LV (२) D, HH, (३) OA, BA, OL, BL, OAL, CP, LC, DW, AAV, (४) SLD, MI (५) MD involving (१) to (४) above

२	राज्य कर निरीक्षक	शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: विकवि-१०२१/ प्र.क्र.१३/वि.प्र.-४, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२१	(१) B, LV (२) D, HH, (३) OA, BA, OL, BL, OAL, CP, LC, DW, AAV, (४) SLD, MI (५) MD involving (१) to (४) above
३	पोलीस उपनिरीक्षक	शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक पोलीस-१८२१/ प्र.क्र.५२/पोल-५अ, दिनांक ०४ ऑगस्ट, २०२१	दिव्यांग उमेदवार पात्र नाही.

४.२०.३ दिव्यांग व्यक्तींसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

४.२०.४ दिव्यांग व्यक्तींची संबंधित संवर्ग/पदाकरीता पात्रता शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

४.२०.५ दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित पदांवर शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्यांची शिफारस करण्यात येईल.

४.२०.६ संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकारचे किमान ४०% दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र धारक उमेदवार / व्यक्ती आरक्षण तसेच नियमानुसार अनुज्ञेय सोयी / सवलतीसाठी पात्र असतील.

४.२०.७ लक्षणीय दिव्यांगत्व असलेले उमेदवार / व्यक्ती खालील सवलतींच्या दाव्यास पात्र असतील:-

(१) दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद लक्षणीय दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित असल्यास नियमानुसार अनुज्ञेय आरक्षण व इतर सोयी सवलती.

(२) दिव्यांगत्याचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद संबंधित दिव्यांग प्रकारासाठी सुनिश्चित केले असल्यास नियमानुसार अनुज्ञेय सोयी सवलती.

४.२०.८ लक्षणीय दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय प्रणालीदवारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

४.२०.९ शासन परिपत्रक, दिव्यांग कल्याण विभाग, क्रमांक: दिव्यांग-२०२४/प्र.क्र.८६/दि.क.२, दिनांक २७ जून, २०२४ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये / भविष्यात वेळोवेळी स्थापन करण्यात आलेल्या / येणाऱ्या वैद्यकीय मंडळामार्फत दिव्यांगत्व प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र (UDID Card) प्राप्त करुन घेणे अनिवार्य आहे. वैश्विक ओळखपत्र (UDID Card) प्राप्त करुन घेण्यासाठी नोंदणी केल्यानंतर प्रत्यक्षात सदर ओळखपत्र प्राप्त होईपर्यन्तच्या कालावधीसाठी दिव्यांग व्यक्तींना दिव्यांगत्वाच्या सवलती / योजनांचा लाभ घेण्यासाठी त्यांचेकडे असलेले दिव्यांगत्व प्रमाणपत्रासोबत वैश्विक ओळखपत्रासाठीचा नाव नोंदणी क्रमांक (Enrollment Number) सादर करणे अनिवार्य राहील. दिव्यांग उमेदवारांनी अर्ज करताना शासन परिपत्रक, दिव्यांग कल्याण विभाग, क्रमांक: दिव्यांग-२०२४/प्र.क्र.८६/ दि.क.२, दिनांक २७ जून, २०२४ मधील सर्व तरतुदींचे अवलोकन करण्यात यावे. त्यातील तरतुदींनुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

४.२०.१० दिव्यांग तपशील विधिग्राह्य होण्याकरीता दिव्यांग उमेदवारांना पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक असेल :-

(१) स्वावलंबन पोर्टलवरुन वितरित दिव्यांग प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र क्रमांक अशा दोन्ही बाबी उपलब्ध असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी सदर दोन्ही तपशील नोंदविणे आवश्यक आहे.

(२) ज्या उमेदवारांकडे सद्यस्थितीत स्वावलंबन पोर्टलवरून वितरित केलेले दिव्यांग प्रमाणपत्र नाही. तथापि राज्य शासनाच्या SADM पोर्टलवहन वितरित करण्यात आलेले दिव्यांग प्रमाणपत्र आहे, अशा उमेदवारांनी SADM प्रमाणपत्रासह वैश्विक ओळखपत्रासाठी नोंदणी केल्याचा क्रमांक (Enrolment Number) नोंदविणे अनिवार्य असेल, तथापि, सदर उमेदवारांना मुलाखतीपूर्वी वैश्विक ओळखपत्र सादर करणे आवश्यक असेल.

(३) उमेदवारांनी खात्यामधील दिव्यांगत्वाचा सर्व आवश्यक तपशील अचूकपणे नोंदवावा दिव्यांगत्वाचा तपशील नोंदविताना तो दिव्यांग प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्रावर नमूद केल्याप्रमाणेच असल्याची खात्री करावी उदा. दिव्यांग प्रमाणपत्र क्रमांक, दिव्यांगत्वाची टक्केवारी, वैश्विक ओळखपत्र क्रमांक, वैश्विक ओळखपत्र वितरणाचा दिनांक इत्यादी तपशील वैश्विक ओळखप्रमाणेच असणे आवश्यक आहे.

(४) दिव्यांगत्वाचा सर्व तपशिल अचूकपणे नोंदविल्यानंतर 'Validate या बटनवर क्लिक करावे.

(५) उमेदवाराचे वैश्विक ओळखपत्रावर नमूद नाव दिव्यांगत्याचा प्रकार व दिव्यांग स्थिती (कायमस्वरुपी/तात्पुरते) इत्यादी तपशील दर्शविले जाईल व सदर तपशील अचूक असल्याचे उमेदवाराने संबंधित बटनवर क्लिक करुन प्रमाणित केल्यानंतर तपशील विधिग्राहा करण्याची प्रक्रिया पूर्ण होईल.

(६) दिव्यांग तपशील विधिग्राह्य होण्याची प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण होण्यासाठी उमेदवाराच्या खात्यामध्ये नमूद जन्मदिनांक व वैश्विक ओळखपत्राकरीता नमूद जन्मदिनांक एकच असणे तसेच दिव्यांगत्वाचा सर्व तपशील अचूकपणे नोंदविणे आवश्यक आहे.

४.२०.११ लक्षणीय दिव्यांगत्व असणा-या उमेदवारांना अर्जामध्ये नमूद केलेला दिव्यांगत्वाचा प्रकार / उप प्रकार बदलणे अनुज्ञेय नाही.

४.२१ अनाथ आरक्षण :-

४.२१.१ अनाथ व्यक्तींचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक: अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३, दिनांक ०६ एप्रिल, २०२३, दिनांक १० मे, २०२३ अनुसार तसेच शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार राहील.

४.२१.२ अनाथ आरक्षण धोरण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, पूरक पत्र, क्रमांक: अनाथ-२०२२/ प्र.क्र.१२२/का-०३, दिनांक १० मे, २०२३ अन्वये एखाद्या भरती प्रक्रियेमध्ये अनाथ आरक्षणाच्या एका प्रवर्गासाठी उपलब्ध जागांवर गुणवत्तेनुसार त्या प्रवर्गातील अनाथ उमेदवार पर्याप्त प्रमाणात उपलब्ध होऊ शकले नाहीत, तर त्या भरती प्रक्रियेमध्ये ती पदे अनाथांच्या दुसऱ्या प्रवर्गातील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

४.२१.३ अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे; त्या प्रवर्गातून करण्यात येईल.

४.२१.४ पूर्व परीक्षेच्या अर्जाद्वारे अनाथ आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी दिनांक ०६ सप्टेंबर, २०२२, दिनांक ०६ एप्रिल, २०२३ आणि दिनांक १० मे, २०२३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार विहित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र आयोगाकडून निश्चित करण्यात येणाऱ्या विहित कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा अनाथ आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नाही.

५. वेतनश्रेणी :- सर्व संवर्गांसाठी S-१४ : रुपये ३८६००-१२२८०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते.

६. पात्रता :-

६.१ भारतीय नागरिकत्व.

६.२ वयोमर्यादा :-

६.२.१ विविध अराजपत्रित प्रवर्ग/ उपप्रवर्गासाठी किमान व कमाल वयोमर्यादा :-

अ.क्र.	संवर्ग	वयोमर्यादा गणण्याचा दिनांक	वय							
			किमान अमागास / मागासवर्गीय / आ. दु. घ.	कमाल		प्राविण्य प्राप्त खेळाडू		माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी		दिव्यांग उमेदवार
				अमागास	मागासवर्गीय / अनाथ/ आ. दु. घ.	अमागास	मागासवर्गीय/ आ. दु. घ.	अमागास	मागासवर्गीय/ आ. दु. घ.	
१	सहायक कक्ष अधिकारी	०१ फेब्रुवारी, २०२५	१८	३८	४३	४३	४३	४३	४३	वयाच्या ४५ वर्षापर्यंत
२	राज्य कर निरीक्षक		१८	३८	४३	४३	४३	४३	४३	वयाच्या ४५ वर्षापर्यंत
३	पोलीस उप निरीक्षक		१९	३१	३४	३६	३६	३६	३६	अपात्र

६.२.२ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकः एसआरव्ही-२०२४/प्र.क्र.३९/ का.१२ (सेवा) , दिनांक २० डिसेंबर, २०२४ अन्वये कमाल वयोमर्यादेत एकवेळची विशेषबाब म्हणून ०१ वर्ष इतकी शिथिलता देण्यात येत आहे.

६.२.३ विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

६.३ अर्हता :-

६.३.१. शैक्षणिक अर्हता :-

(एक) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने विहित केलेली समतुल्य अर्हता.

(दोन) मुख्य परीक्षेकरीता अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी विहित पद्धतीने आवश्यक अर्ज/माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

(तीन)अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवी धारकाने ही अट मुख्य परीक्षेचा अर्ज/माहिती स्वीकारण्याच्या विहित दिनांकापर्यत पूर्ण केली असली पाहिजे.

(चार) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

६.३.२. शारीरिक पात्रता :-

(एक) पोलीस उपनिरीक्षक संवर्गाकरीता विकल्प नमूद करणाऱ्या उमेदवारांकडे उपरोक्त अर्हतेसोबत खालीलप्रमाणे किमान शारीरिक पात्रता असणे आवश्यक आहे :-

शारीरिक मोजमाप	पुरुष	महिला	उभयलिंगी
उंची	किमान १६५ सें. मी. (अनवाणी)	किमान १५७ सें.मी. (अनवाणी)	(अ) स्वत:ची लिंग ओळख पुरूष अशी केलेल्या उमेदवारांसाठी - किमान १६५ सें.मी. (ब) स्वत:ची लिंग ओळख महिला/तृतीय पंथी अशी केलेल्या उमेदवारांसाठी - किमान १५७ सें.मी.
छाती	न फुगविता ७९ से.मी. फुगविण्याची क्षमता किमान ५ से.मी. आवश्यक	आवश्यक नाही	स्वत:ची लिंग ओळख महिला/पुरूष/तृतीय पंथी अशी केलेल्या उमेदवारांसाठी - आवश्यक नाही.

(दोन) पोलीस उपनिरीक्षक पदावरील नियुक्तीकरीता शिफारस पात्र उमेदवारांची शारीरिक मोजमापे नियुक्ती करण्यापूर्वी शासनामार्फत सक्षम प्राधिका-याकडून तपासून घेण्यात येतील. विहित शारीरिक पात्रता नसल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी अपात्र ठरेल.

६.३.४ अर्हता/पात्रता गणण्याचा दिनांक :-

मुख्य परीक्षेकरीता अर्ज स्वीकारण्यासाठी विहित अंतिम दिनांकापर्यंत किंवा त्यापूर्वी विहित शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे अनिवार्य आहे.

७. निवडप्रकिया :-

७.१ जाहिरातीमध्ये नमूद अर्हता/पात्रतेविषयक अटी किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार शिफारशीसाठी पात्र असणार नाही.

७.२ सेवा भरतीची संपूर्ण प्रक्रिया खालील सेवा प्रवेश नियम अथवा तदनंतर शासनाकडून वेळोवेळी करण्यात येणा-या सुधारणा तसेच आयोगाकडून वेळोवेळी सुधारण्यात येणाऱ्या कार्यनियमावलीतील तरतुदींनुसार राबविण्यात येईल :-

(१) सहायक कक्ष अधिकारी, गट-ब (अराजपत्रित) सेवाप्रवेश नियम २०१८.

(२) राज्य कर निरीक्षक, (विक्रीकर निरीक्षक) गट-ब (अराजपत्रित) सेवाप्रवेश नियम २०२१.

(३) पोलीस उप निरीक्षक, गट-ब (अराजपत्रित) सेवाप्रवेश नियम १९९५.

८. परीक्षेचे टप्पे —

मुख्य परीक्षा :-

(एक) सहायक कक्ष अधिकारी, राज्य कर निरीक्षक, पोलीस उप निरीक्षक संवर्गांकरीता संयुक्त मुख्य परीक्षा - ४०० गुण

(दोन) फक्त पोलीस उपनिरीक्षक पदासाठी शारीरिक चाचणी — १०० गुण, मुलाखत-४० गुण

८.१ विविध संवर्गाकरीता भरती प्रक्रिया खालीलप्रमाणे त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या टप्प्यामध्ये राबविण्यात येईल :-

अ.क्र.	परीक्षा	संवर्ग	टप्पे
१	महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त मुख्य परीक्षा	(१) सहायक कक्ष अधिकारी (२) राज्य कर निरीक्षक	फक्त लेखी परीक्षा
		(३) पोलीस उप निरीक्षक	(१) लेखी परीक्षा (२) शारीरिक चाचणी (३) मुलाखत

८.२ मुख्य परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे:-

पेपर क्रमांक व संकेतांक	विषय	प्रश्नसंख्या	गुण	दर्जा	माध्यम	कालावधी	प्रश्नपत्रिकेचे स्वरुप
महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त मुख्य परीक्षा							
१ (संकेतांक १०६२)	मराठी	५०	१००	बारावी	मराठी	एक तास	वस्तुनिष्ठ बहुपर्यायी
	इंग्रजी	५०	१००	पदवी	इंग्रजी		
२ (संकेतांक १०६३)	सामान्य अध्ययन व बुध्दिमत्ता चाचणी	१००	२००	पदवी	मराठी व इंग्रजी	एक तास	

८.३ पोलीस उपनिरीक्षक संवर्गातील पदभरतीसाठी शारीरिक चाचणी १०० गुणांची असेल.

८.४ शारीरिक चाचणीचे गुण अर्हताकारी (Qualifying) स्वरुपाचे असून एकूण गुणांपैकी किमान ६० टक्के गुण (म्हणजेच ६० गुण) मुलाखतीस पात्र होण्यासाठी आवश्यक राहतील. तसेच या गुणांचा अंतिम गुणवत्तेकरीता/अंतिम निवडीकरीता विचार होणार नाही.

८.५ शारिरीक चाचणीमध्ये किमान ६० टक्के गुण धारण करणा-या उमेदवारांकरीता ४० गुणांची मुलाखत घेण्यात येईल.

८.६ मुख्य परीक्षेतील गुण व मुलाखतीमधील एकत्रित गुणांच्या आधारे पोलीस उपनिरीक्षक संवर्गाकरीता निवडप्रक्रिया राबविण्यात येईल.

८.७ आयोगाच्या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रस्तुत परीक्षेच्या परीक्षा योजना/ पध्दतीनुसार मुख्य परीक्षेची अंतिम निकाल प्रक्रिया राबविण्यात येईल.

८.८ मुख्य परीक्षेस प्रवेश :-

८.८.१ महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा — २०२४ च्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या आणि पूर्व परीक्षेच्या जाहिरातीमध्ये नमूद शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची विहित दिनांकास किंवा त्यापूर्वी पुर्तता करणा-या उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

८.८.२ संयुक्त मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेस अनुसरुन, अर्ज करणा-या उमेदवारांकडून ते महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवेतील एक किंवा त्यापेक्षा जास्त संवर्ग/पदांसाठी बसू इच्छितात किंवा कसे, याबाबत विकल्प (Option) घेण्यात येईल.

८.८.३ संबंधित संवर्ग/पदाकरीता उमेदवाराने दिलेला/ले विकल्प हा/हे संबंधित पद भरतीकरीता अर्ज समजण्यात येईल/येतील.

८.८.४ मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाकडून निश्चित केलेल्या सीमांकन रेषा व मर्यादेनुसार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी अर्हताप्राप्त ठरणाऱ्या तसेच जाहिरात/अधिसूचनेतील तरतुदींनुसार आवश्यक शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांस मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

८.८.५ संयुक्त पूर्व परीक्षेच्या एकत्रित निकालाच्या आधारे गट-ब सेवेच्या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची प्रस्तुत अधिसूचनेमधील संवर्गांसाठी एकच संयुक्त मुख्य परीक्षा घेण्यात येईल.

८.८.६ संबंधित संवर्गाच्या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवाराने आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या कालावधीत आयोगाच्या https://mpsconline.gov.in या संकेतस्थळाव्दारे फक्त ऑनलाईन पध्दतीने आवश्यक अर्ज/माहिती सादर करणे आवश्यक राहील.

८.८.७ महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारास मुख्य परीक्षेकरीता अर्ज सादर करुन विहित परीक्षा शुल्क भरावे लागेल.

८.८.८ संयुक्त मुख्य परीक्षेस अर्ज करताना **दिलेला/ले विकल्प** तसेच संवर्गनिहाय भरावयाच्या पदसंख्येच्या तसेच पात्रतेच्या आधारे संबंधित संवर्गाकरीता अर्हताप्राप्त ठरणाऱ्या उमेदवारांसाठी मुख्य परीक्षेचा **स्वतंत्र संवर्गनिहाय** निकाल जाहीर करण्यात येईल.

८.८.९ सामाजिक तसेच समांतर आरक्षणाच्या वैध दाव्यांच्या आधारे संबंधित उमेदवार मुख्य परीक्षेमध्ये केवळ आरक्षित प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी विहित केलेल्या गुणांच्या किमान सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त झाल्यास अंतिम शिफारशींच्या वेळी त्यांची उमेदवारी केवळ संबंधित आरक्षित प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी विचारात घेतली जाईल. आरक्षित प्रवर्ग/उपप्रवर्गाच्या गुणांच्या किमान सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी अराखीव (खुला) पदावरील निवड/शिफारसीसाठी विचारात घेतली जाणार नाही.

८.८.१० उमेदवाराचा मुख्य परीक्षेचा अर्ज सादर करताना दिलेला संवर्गाचा विकल्प विचारात घेऊन पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची संख्या निश्चित करण्यात येईल.

८.८.११ प्रस्तुत पदाच्या संयुक्त पूर्व परीक्षेसाठी अर्ज करतेवेळी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता नसल्यास, मुख्य परीक्षेकरिता आवश्यक अर्ज/माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यास, अशा उमेदवाराला शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक नमूद करता येईल. अर्जातील इतर कोणत्याही दाव्यामध्ये बदल करता येणार नाही.

८.९ पोलीस उपनिरीक्षक संवर्गाकरीता शारीरिक चाचणी व मुलाखत:-

(एक) भरावयाच्या एकूण पदांपैकी प्रत्येक आरक्षित प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी सुमारे ४ पट उमेदवार शारीरिक चाचणीसाठी उपलब्ध होतील, अशा रितीने गुणांची किमान सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल.

(दोन) शारीरिक चाचणी :-

(१) उंची व छातीविषयक विहित मोजमापाच्या अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांचीच शारीरिक चाचणी घेण्यात येईल. सदर चाचणी पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र असेल.

(२) शारीरिक चाचणीच्या वेळी उंची व छातीविषयक विहित मोजमापाच्या अटी पूर्ण न करणाऱ्या उमेदवारांची उंची / छाती मापनाविषयी काही तक्रार असल्यास त्यांनी त्याच दिवशी आयोगाकडे आपला तक्रार अर्ज सादर करणे आवश्यक आहे. याबाबत योग्य तो विचारविनिमय करुन अपात्र उमेदवारांच्या उंची / छातीचे फेरमापन घेण्याकरिता उमेदवारांना स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

(३) आयोगाच्या वेळापत्रकानुसार अशा उमेदवारांच्या उंची व छातीविषयक फेरमोजमापनाकरिता दिनांक, वेळ व ठिकाण निश्चित करण्यात येईल.

(४) फेरमापनाच्या अनुषंगाने पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची शारीरिक चाचणी त्याच दिवशी अथवा आयोगाकडून निश्चित करण्यात येणाऱ्या दिनांकास घेण्यात येईल. तसेच शारीरिक चाचणीत पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची मुलाखत स्वतंत्रपणे घेण्यात येईल.

(५) शारीरिक चाचणी एकूण १०० गुणांची असेल.

(६) शारीरिक चाचणीचे गुण अर्हताकारी (Qualifying) स्वरुपाचे असून एकूण गुणांपैकी किमान ६० टक्के गुण (म्हणजेच ६० गुण) मुलाखतीस पात्र होण्यासाठी आवश्यक राहतील. तसेच या गुणांचा अंतिम गुणवत्तेकरीता/अंतिम निवडीकरीता विचार होणार नाही.

(७) शारीरिक चाचणीतील एकूण गुणांची बेरीज अपूर्णांकात असल्यास ती अपूर्णांकातच ठेवण्यात येईल.

(८) शारीरिक चाचणीचा तपशील:-

पुरुषांसाठी / स्वत:ची लिंग ओळख पुरुष अशी केलेल्या तृतीयपंथी उमेदवारांकरीता	महिलांसाठी / स्वत:ची लिंग ओळख महिला/तृतीयपंथी अशी केलेल्या तृतीयपंथी उमेदवारांकरीता
(१) धावणे (८०० मीटर) - कमाल गुण - ५०	(१) धावणे (४०० मीटर) - कमाल गुण - ५०
(२) पुल अप्स - कमाल गुण - २०	(२) लांब उडी - कमाल गुण - ३०
(३) गोळाफेक-वजन-७.२६० कि.ग्रॅ. - कमाल गुण - १५	(३) गोळाफेक-वजन-४ कि.ग्रॅ.- कमाल गुण - २०
(४) लांब उडी - कमाल गुण - १५	

(९) शासन अधिसूचना, गृह विभाग, दिनांक २२ जून, २०२३ अनुसार तृतीय पंथी व्यक्तींनी जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करताना स्वत:ची लिंग ओळख पुरुष, महिला किंवा तृतीय पंथी असे स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे.

(१०) तृतीयपंथी उमेदवारास त्यांची पुरुष, महिला किंवा तृतीयपंथी अशी स्वत:ची लिंग ओळख निश्चित करणे आवश्यक राहील व यासंदर्भात सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले विहित नमुन्यातील प्रमाणपत्र शारीरिक चाचणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील.

(११) पोलीस उपनिरीक्षक पदावरील नियुक्तीकरीता शिफारस झालेल्या उमेदवारांची शारीरिक मोजमापे नियुक्ती करण्यापूर्वी शासनामार्फत सक्षम प्राधिका-यांकडून तपासून घेण्यात येतील. वरील परिच्छेद ६.३.२(एक) प्रमाणे विहित शारीरिक पात्रता नसल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी अपात्र ठरेल.

(तीन) मुलाखत:-

(१) शारीरिक चाचणीच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल.

(२) पोलीस उपनिरीक्षक संवर्गाकरीता मुलाखत ४० गुणांची असेल.

(३) मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/अधिसूचनेतील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे तपासली जातील आणि अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घेतली जाईल.

८.१० गुणवत्ता यादी:-

(१) पोलीस उपनिरीक्षक संवर्गाकरीता शारीरिक चाचणी व मुलाखतीनंतर मुख्य परीक्षा व मुलाखतीमध्ये प्राप्त एकूण गुणांच्या आधारे गुणवत्ताक्रमानुसार सर्वसाधारण गुणवत्ता यादी (General Merit List) तयार करण्यात येईल.

(२) सहायक कक्ष अधिकारी, राज्य कर निरीक्षक, संवर्गातील निवडीकरीता संयुक्त मुख्य परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या एकूण गुणांच्या आधारे गुणवत्ताक्रमानुसार **संवर्गनिहाय** सर्वसाधारण गुणवत्ता यादी (General Merit List) तयार करण्यात येईल.

(३) गुणवत्ता यादीमधील समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांची क्रमवारी (Ranking) आयोगाच्या दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकातील तरतुदीनुसार निश्चित करण्यात येईल.

८.११ अंतिम निकाल प्रक्रिया

८.११.१ भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे (Opting Out):-

(१) प्रथम वरील कार्यपद्धतीनुसार सर्व संवर्गासाठी संवर्गनिहाय स्वतंत्र सर्वसाधारण गुणवत्ता यादी (General Merit List) तसेच तात्पुरती निवड यादी (Provisional Selection List) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

(२) तात्पुरती निवड यादीच्या आधारे भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (ऑप्टिंग आऊट) पर्याय सादर करण्यासाठी संबंधित उमेदवारांना ७ दिवसांचा कालावधी देण्यात येईल.

(३)आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे उमेदवारांकडून प्राप्त " भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे " हा पर्याय लक्षात घेऊन पोलीस उप निरीक्षक संवर्ग वगळून इतर संवर्गांसाठी सुधारीत तात्पुरती निवड यादी तयार करण्यात येईल.

(४)पदभरतीकरीता भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे याबाबतची कार्यवाही फक्त आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे विहित कालावधीमध्ये करणे अनिवार्य आहे. यासंदर्भातील इतर कोणत्याही पद्धतीने केलेल्या तसेच नंतरच्या टप्प्यावर भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय रद्द करण्यासंदर्भात केलेल्या विनंतीचा विचार केला जाणार नाही.

(५) पोलीस उपनिरीक्षक संवर्गासाठी शारिरीक चाचणी व मुलाखतीनंतर जाहीर केलेल्या सर्वसाधारण गुणवत्ता यादी व तात्पुरत्या निवड यादीनुसार भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय उमेदवारांना देण्यात येईल व हा पर्याय विचारात घेऊन पोलीस उपनिरीक्षक संवर्गाची अंतिम शिफारस यादी तयार करण्यात येईल.

८.११.२ संमती विकल्प (Consent Submission) :- (पोलीस उपनिरीक्षक वगळून इतर सर्व संवर्गांसाठी)

(१) उपरोक्तप्रमाणे **भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय (Opting Out)** दिल्यानंतर पोलीस उपनिरीक्षक संवर्ग वगळून उर्वरित संवर्गांसाठी सुधारित तात्पुरती निवड यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

(२) महाराष्ट्र गट ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त मुख्य परीक्षेतील पोलीस उप निरीक्षक संवर्ग वगळता इतर संवर्गांकरीता आयोगाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या संवर्गनिहाय सुधारीत तात्पुरत्या निवड यादीमध्ये (Revised Provisional Selection List) उमेदवाराची एकापेक्षा जास्त संवर्गासाठी निवड होत असल्यास अशा उमेदवारांकडून प्रथम पसंती (First Choice) बाबत संमती विकल्प (Consent Submission) मागविण्यात येईल. उमेदवाराचा विचार फक्त संमती विकल्प दिलेल्या संवर्गासाठी करण्यात येईल.

(३) सदर संमती विकल्प (Consent Submission) आयोगाकडून सुधारीत तात्पुरती निवड यादी (Revised Provisional Selection List) प्रसिद्ध केल्यानंतर उमेदवाराच्या प्रोफाईल मध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल.

(४) एका पेक्षा जास्त संवर्गासाठी उमेदवाराची निवड झाल्यास सुधारीत तात्पुरत्या निवड यादीतील (Revised Provisional Selection List) ज्या एका संवर्गाची निवड उमेदवारास स्वीकारावयाची **असेल**, त्याकरीता उमेदवारास **" स्वीकारले " (Accepted)"** हा पर्याय निवडणे अनिवार्य आहे.

(५) सुधारीत तात्पुरत्या निवड यादीतील (Revised Provisional Selection List) ज्या संवर्गाची निवड उमेदवारास स्वीकारावयाची **नसेल**, त्या संवर्गासाठी उमेदवारास **" Give up"** हा पर्याय निवडणे अनिवार्य आहे.

(६) उमेदवाराने ज्या संवर्गासाठी **" Give up"** हा पर्याय निवडला असेल, त्या संवर्गाकरीता त्यांच्या उमेदवारीचा विचार न करता इतर उमेदवारांचा गुणवत्तेवर विचार करण्यात येईल.

(७) आयोगाकडून निश्चित केलेल्या कालावधीत विहीत ऑनलाईन पध्दतीने संमती विकल्प सादर न केल्यास मुख्य परीक्षेच्या जाहिरातीतील/अधिसूचनेतील संवर्गाच्या क्रमानुसार संबंधित उमेदवाराचा अंतिम निवडीकरीता विचार करण्यात येईल. म्हणजेच उमेदवाराची पसंती मुख्य परीक्षेच्या जाहिरातीतील नमूद संवर्गाच्या क्रमवारीनुसार ग्राह्य धरून प्रथम क्रमांकाच्या संवर्गाकरीता स्वीकारले (Accepted) व उर्वरीत संवर्गाकरीता त्याने Give Up केले असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(८) संवर्गाचे विकल्प, भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे (Opting Out) तसेच 'संमती विकल्प (Consent Submission)' याबाबतची कार्यवाही फक्त आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे विहित कालावधीमध्ये करणे अनिवार्य असेल.

(९) भरतीप्रक्रिये दरम्यान विहित कालावधीनंतर संमती विकल्प (Consent Submission) सादर करण्याची अथवा त्यामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य करण्यात येणार नाही.

८.११.३ तात्पुरत्या निवड यादीस अनुसरून लागू असेल त्याप्रमाणे भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (ऑप्टिंग आऊट), 'संमती विकल्प (Consent Submission)' इत्यादीचा पर्याय सादर केलेल्या उमेदवारांचा विदा (Data) लक्षात घेऊन संवर्गनिहाय अंतिम शिफारस यादी (Final Recommendation List) तयार करण्यात येईल.

८.११.४ महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवेतील संवर्गांकरीता आयोगाच्या धोरणानुसार प्रतिक्षा यादी राहील.

८.११.५ गुणवत्ता यादीमधील समान गुण धारण करणा-या उमेदवारांची क्रमवारी(Ranking) आयोगाच्या दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकामधील तरतुदीनुसार निश्चित करण्यात येईल.

८.११.६ सहायक कक्ष अधिकारी, राज्य कर निरीक्षक संवर्गाकरीता मुख्य परीक्षेमधून पात्र होण्याकरीता शतमत (Percentile) पध्दत लागू आहे.

८.११.७ पोलीस उपनिरीक्षक पदाकरीता मुख्य परीक्षेमधून शारीरिक चाचणीसाठी पात्र होण्याकरीता शतमत **(Percentile)** पध्दत लागू आहे.

८.११.८ प्रस्तुत परीक्षेमध्ये सर्वाधिक गुण मिळविणा-या उमेदवारांच्या एकूण गुणांच्या खालीलप्रमाणे किमान गुण प्राप्त करणारे उमेदवार शिफारशीसाठी तसेच शारीरिक चाचणीसाठी पात्र असतील :-

(१) अमागास - किमान ३५ शतमत

(२) मागासवर्गीय - किमान ३० शतमत

(३) दिव्यांग - किमान २० शतमत

(४) अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू - किमान २० शतमत

(५) अनाथ - किमान ३० शतमत

९. शिफारस:-

८.१"उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार उमेदवारांच्या शिफारसी शासनाच्या संबंधित विभागाकडे करण्यात येतील.

८.२ सर्व संवर्गाकरीता मुख्य परीक्षेमधून शिफारसपात्र होण्याकरीता शतमत **(Percentile)** पध्दत लागू राहील.

८.४ समांतर आरक्षणाच्या आधारे किमान गुणांच्या सीमारेषेनुसार शिफारशीसाठी पात्र ठरणाऱ्या उमेदवारास कोणतीही एक सवलत देय राहील.

८.५ शिफारसपात्र उमेदवारांची नावे आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

८.६ शिफारशीनंतर नियुक्तीसाठी शासनाकडे शिफारस करण्यात आली आहे किंवा नाही, याबाबत उमेदवारांना प्रोफाईलद्वारे कळविण्यात येईल.

१०. प्रमाणपत्र पडताळणी:-

१०.१ संबंधित मुख्य परीक्षेच्या निकालाच्या आधारे शिफारस पात्र ठरलेल्या उमेदवारांना प्रमाणपत्र पडताळणीसाठी आवश्यकतेनुसार मुख्य परीक्षेच्या निकालापूर्वी, निकालानंतर अथवा नियुक्तीपूर्वी सक्षम प्राधिका-यांकडून बोलविण्यात येईल.

१०.२ आयोगाने निश्चित केलेल्या किमान सीमारेषेनुसार शिफारस पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/ शासन परिपत्रकातील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे तपासली जाईल.

१०.३ अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणाऱ्या उमेदवारांची प्रमाणपत्र पडताळणी केली जाईल.

१०.४ विहित कागदपत्रे सादर करू न शकणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच त्याकरीता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

१०.५ प्रमाणपत्र पडताळणी यासंदर्भात निश्चित करण्यात आलेल्या कार्यक्रमानुसार तसेच निश्चित केलेल्या ठिकाणी व विहित वेळेस घेण्यात येतील. त्याकरीता उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१०.६ केवळ अर्जातील दाव्यानुसार करण्यात आलेल्या प्रमाणपत्र पडताळणीच्या आधारे पात्र ठरलेले उमेदवार शिफारस/ नियुक्तीसाठी पात्र ठरतील.

११. मुख्य परीक्षेकरीता अर्ज करण्याची पध्दत :-

११.१ अर्ज सादर करण्याचे टप्पे :-

(एक) आवश्यक असल्यास खाते अद्ययावत करणे.

(दोन) विहित कालावधीत तसेच विहित पध्दतीने खालीलप्रमाणे लागू असेल त्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रे अपलोड करुन अर्ज सादर करणे .

(तीन) परीक्षा शुल्काचा भरणा विहित पध्दतीने करणे.

(चार) जिल्हा केंद्र निवड करणे.

११.२ विहित कागदपत्रे/प्रमाणपत्रे अपलोड करणे :-

(एक)प्रोफाईलद्वारे केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने उमेदवारांची पात्रता आजमावल्यानंतर (Check eligibility) उमेदवार जाहिरातीनुसार पात्र ठरत असल्यास अर्ज सादर करताना खालील कागदपत्रे/प्रमाणपत्रे (लागूअसलेली) अपलोड करणे अनिवार्य आहे :-

अ. क्र.	प्रमाणपत्र/कागदपत्र	फाईल फॉर्मेट	किमान फाईल साईज (KB)	कमाल फाईल साईज (KB)
१	एस.एस.सी. अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता	PDF	५०	५००
२	वयाचा पुरावा	PDF	५०	५००
३	शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा	PDF	५०	५००
४	सामाजिकदृष्टया मागासवर्गीय असल्याबाबतचा पुरावा	PDF	५०	५००
५	आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा	PDF	५०	५००
६	नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र	PDF	५०	५००
७	पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा	PDF	५०	५००
८	पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा	PDF	५०	५००
९	खेळाडूसाठीच्या आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा	PDF	५०	५००
१०	अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा	PDF	५०	५००
११	मागासवर्गीय, आ.दु.घ., अराखीव माहिला, खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक, अनाथ आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र	PDF	५०	५००
१२	विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा	PDF	५०	५००
१३	मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा(लागू असल्यास)	PDF	५०	५००
१४	लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन	PDF	५०	५००

(दोन) उपरोक्त प्रमाणपत्र/कागदपत्रे आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचना प्रकरण क्रमांक चार तसेच प्रस्तुत अधिसूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे असणे अनिवार्य आहे.

(तीन) संबंधित जाहिरातीस अनुसरुन विहित निकष/पात्रता तसेच प्रोफाईलमधील दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड करावी लागतील. प्रोफाईलमधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अपलोड करावयाची संबधित कागदपत्रे प्रणालीद्वारे अर्ज सादर करताना प्रदर्शित होतील.

(चार) पात्रतेसंदर्भातील विविध दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड केल्याशिवाय अर्ज सादर करता येणार नाही.

११.३ सर्वसाधारण :-

(एक) अर्ज फक्त आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे स्वीकारण्यात येतील.

(दोन) अर्ज सादर करण्याकरीता संकेतस्थळ :- https://mpsconline.gov.in

(तीन) अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mpsconline.gov.in तसेच https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

(चार) आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

११.४ जिल्हा केंद्र निवड :-

(एक) प्रस्तुत मुख्य परीक्षा अमरावती, छत्रपती संभाजी नगर, नागपूर, नाशिक, नवी मुंबई व पुणे जिल्हा केंद्रांवर घेण्यात येईल. अर्ज सादर करतानाच जिल्हा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे.

(दोन) जिल्हा केंद्र बदलाबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत अथवा कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही

(तीन) एखादे जिल्हा केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही अथवा एखाद्या जिल्हा केंद्रांवर उमेदवारांना प्रवेश देण्याची क्षमता ओलांडली गेली तर ते जिल्हाकेंद्र निवडलेल्या उमेदवारांची बैठक व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल.

(चार) एकदा निवडलेल्या जिल्हा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या परीक्षा उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

(पाच)वरीलप्रमाणे जिल्हा केंद्रनिवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या कायमस्वरुपी रहिवासाच्या पत्त्याच्याआधारे संबंधित महसुली मुख्यालयाच्या जिल्हाकेंद्रावर किंवा नजिकच्या जिल्हाकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल. याबाबत आयोगाचे त्या त्या वेळचे धोरण व आयोगाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

११.५ परीक्षा शुल्काचा भरणा:-

११.५.१ परीक्षा शुल्क (रुपये) :

(एक) अमागास - **रु. ५४४/-**

(दोन) मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ/दिव्यांग - **रु. ३४४/-**

(तीन) उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.

(चार) परीक्षा शुल्क ना-परतावा (Non-refundable) आहे.

११.५.२ अर्ज सादरीकरणाचे टप्पे पूर्ण झाल्यावर उपलब्ध होणाऱ्या 'Submit and Pay fees' या बटनवर क्लिक केल्यानंतर किंवा मुख पृष्ठावरील 'माझे खाते' या सदराखालील अर्ज केलेल्या पदांच्या यादीतील 'Fees not Paid' अशी सद्यस्थिती लिहिलेल्या जाहिरात/पद/परीक्षेसमोरील ' Pay Now' या लिंकवर क्लिक करुन परीक्षा शुल्काचा भरणा करता येईल.

११.५.३ परीक्षा शुल्काचा भरणा खालील दोन पध्दतीने करता येईल:-

(एक) **ऑनलाईन पध्दतीने :-**

(१) भारतीय स्टेट बँक तसेच प्रणालीद्वारे उपलब्ध करून दिलेल्या कोणत्याही एका पेमेंट गेटवेच्या माध्यमातून क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगद्वारे परीक्षा शुल्क अदा करता येईल.

(२) परीक्षा शुल्काचा भरणा करताना बँक खात्यामधून परीक्षा शुल्काच्या रकमेची वजावट झाल्यावर परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वीपणे झाला (Payment Successful) असल्याचा संदेश आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या पृष्ठावर प्रदर्शित झाल्याशिवाय व परीक्षा शुल्काची पावती तयार झाल्याशिवाय संकेतस्थळावरील संबंधित पृष्ठावरून आणि/अथवा खात्यातून लॉगआऊट होऊ नये.

(३) परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी झाला आहे किंवा कसे, याची स्थिती (status)लगेचच अवगत होईल. खात्यातून Logout होण्यापूर्वी परीक्षा शुल्क यशस्वीपणे भरले असल्याबाबत व बँकेकडून व्यवहार (Transaction) पूर्ण झाला असल्याबाबत खात्री करण्याची जबाबदारी उमेदवाराची आहे.

(४)कोणत्याही कारणामुळे विहित कालावधीत ऑनलाईन पद्धतीने परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वीपणे करणे शक्य न झाल्यास अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकानंतर दोन दिवसापर्यंत परीक्षाशुल्काचा भरणा ऑफलाईन पद्धतीने करण्याकरीता चलनाची प्रत घेता येईल.

(दोन) **ऑफलाईन पध्दतीने :- चलनाद्वारे**

चलनाद्वारे परीक्षा शुल्काचा भरणा करण्याचा विकल्प निवडल्यास उपलब्ध होणारी चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत बँकेच्या कार्यालयीन वेळेत विहित अंतिम दिनांकापूर्वी परीक्षा शुल्काचा भरणा करता येईल. तथापि, चलनाची प्रत घेणे व बँकेत शुल्क जमा करणे, यामध्ये किमान तीन तासांचे कालावधी राहील, याची दक्षता घ्यावी.

११.५.४ परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी न झाल्यास पुन्हा शुल्क भरण्याची अथवा चलन घेण्याबाबतची कार्यवाही प्रस्तुत जाहिरातीच्या/अधिसूचनेच्या अनुषंगाने विहित दिनांकापूर्वीच करणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणास्तव व्यवहार अयशस्वी ठरल्यास यासंदर्भातील तक्रारीची आयोगाकडून दखल घेतली जाणार नाही.

११.५.५विहित मुदतीत परीक्षा शुल्काचा भरणा करु न शकलेल्या उमेदवारांचा संबंधित भरतीप्रक्रियेकरीता विचार केला जाणार नाही. यासंदर्भात आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचनांमधील संबंधित तरतुदींचे अवलोकन करणे उमेदवारांच्या हिताचे राहील.

१२. प्रवेशप्रमाणपत्र :-

१२.१ परीक्षेस प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेशप्रमाणपत्रे आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळावर (https://mpsconline.gov.in) उमेदवारांच्या प्रोफाईलद्वारे परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे **७** दिवस अगोदर उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१२.२ परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वत:चे प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

१२.३ प्रवेश प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात आल्यानंतर उमेदवाराला त्याच्या आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे कळविण्यात येईल. याबाबतची घोषणा आयोगाच्या संकेतस्थळावर परीक्षेपूर्वी एक सप्ताह अगोदर प्रसिद्ध करण्यात येईल.

१२.४ परीक्षेच्या दिनांकापूर्वी ३ दिवस अगोदर प्रवेश प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास अर्ज सादर केल्याच्या आवश्यक पुराव्यासह आयोगाच्या कार्यालयाकडे संपर्क साधावा.

१२.५ परीक्षेच्यावेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसेन्स यापैकी किमान कोणतेही **एक मूळ ओळखपत्र** तसेच मूळ ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

१२.६ आधार कार्डच्या ऐवजी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड केलेले ई-आधार सादर करणा-या उमेदवारांच्या बाबतीत ई-आधार वर उमेदवाराचे नाव, पत्ता, लिंग, फोटो, जन्मदिनांक या तपशीलासह आधार निर्मितीचा दिनांक (Date of Aadhaar generation) व आधार डाऊनलोड केल्याचा दिनांक असल्यासच तसेच सुस्पष्ट फोटोसह **रंगीत प्रिंट** मध्ये आधार डाऊनलोड केले असल्यासच ई-आधार वैध मानण्यात येईल.

१२.७ नावांमध्ये बदल केलेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहित स्त्रियांच्या बाबतीत), नावांत बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावांत बदल झाल्यासंबंधीचा दाखला व त्याची छायांकित प्रत परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

१३. सेवाप्रवेशोत्तर शर्ती :-

नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील :-

(एक) जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा

(दोन) हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा

(**तीन**) शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान(सा.प्र.वि.), क्रमांक: मातंस-२०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ०४ फेब्रुवारी, २०१३, शासन पूरकपत्र, क्रमांक मातंस-२०१२/प्रक्र.२७७/३९, दिनांक ०८ जानेवारी, २०१८ व १६ जुलै, २०१८ अथवा महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने यासंदर्भात वेळोवेळी विहित केलेली संगणक हाताळणीबाबतची प्रमाणपत्र परीक्षा

१४. प्रस्तुत अधिसूचनेमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, अर्जासोबत सादर करण्यावयाची कागदपत्रे इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील स्पर्धा परीक्षेअंतर्गत '**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**', संकेतस्थळावरील विविध विभाग/उपविभागांमध्ये (Menu/Sub-menu) वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचना, परिपत्रके इत्यादी तसेच "**परीक्षा योजना**" विभागातील **'महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त परीक्षा '** मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व अधिसूचना अधिकृत समजण्यात येईल.

१५. प्रस्तुत परीक्षेच्या आयोजनाच्या दिनांकास अन्य संस्थेची परीक्षा असल्यास उमेदवारास कोणती परीक्षा द्यावयाची आहे; याबाबतचा निर्णय उमेदवाराने स्वत: घेणे आवश्यक राहील.

१६. पदभरतीसंदर्भात काही अनुचित प्रकार घडल्यास महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गास प्रतिबंध) अधिनियम, २०२४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून कार्यवाही करण्यात येईल.

१६. सदर अधिसूचना आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ठिकाण : नवी मुंबई.
दिनांक : **१९ मे, २०२५**

उप सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

(**१**) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे. (**२**) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.